MAHMAR 19356/13/1/2000-TC

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक १ / सप्टेंबर २०१२

## संपादकीय

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य

लोकशाही जिवंत असण्याची जी काही लक्षणे आहेत त्यापैकी अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे एक महत्त्वाचे लक्षण आहे. या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणल्याबद्दल अनेक कलाकारांविरुद्ध अनेकदा गदारोळ होत असतो. आपल्या व्यवस्था ज्या पद्धतीने राबविल्या जात आहेत, त्या प्रक्रियेबद्दल आक्षेप घ्यायलाच हवा असे आजचे वास्तव आहे. लोकशाहीची कोणतीही प्रक्रिया चालवण्यासाठी एक व्यवस्था असणे आवश्यक असते. त्यामुळे सकारात्मक विचारांच्या प्रकटीकरणातून व्यवस्था बदलवण्याचे प्रयत्न सातत्याने व्हायला हवेत याबद्दल दुमत होऊ नये.

'जसे लोक तसे त्यांचे नेते' असे म्हटले जाते. सर्वार्थाने भ्रष्ट आणि विवेकहीन अशा नेतृत्वामुळे लोकांच्या मनात सदैव एक राग असतो. त्या विरुद्ध आवाज उठवण्यासाठी एखादे माध्यम हाती असावे लागते.

असीम त्रिवेदी या तरुणाने त्याच्या हातात असलेल्या व्यंगचित्रकलेचा वापर केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर पुन्हा एकवार चर्चा निर्माण झाली. आण्णा हजारे यांचा समर्थक असणाऱ्या या चित्रकाराने काही व्यंगचित्रे काढून आण्णांच्या उपोषणाच्यावेळी दाखवली. आण्णांच्या आंदोलनाचा फज्जा उडाला. त्यानंतर आण्णा आणि त्यांचे सहकारी यांच्यातच वादंग निर्माण झाला. थोडक्यात या आंदोलनाचा 'ताप' बरा झाला. याला अनेक दिवस लोटले आणि मध्येच हे आसीम त्रिवेदीचे प्रकरण पोलीसांच्या अकार्यक्षतेमुळे प्रकाश झोतात आले. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन आदी सर्व माध्यमांनी या प्रकरणाची दखल घेतली त्यामागील कारण पोलीस हे होते.

या चित्रकाराने आपल्या व्यंगचित्रात नेमके काय काढले होते, हे सर्वांना एव्हाना समजले आहे. त्याने जे काढले त्यातून देशद्रोह होतो की नाही हा मुद्दा वेगळा, परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली काय काढावे आणि काय काढू नये यांबद्दल मात्र बरेच काही सांगण्यासारखे असते. ही चित्रे त्याने फेसबुकवर व आपल्या ब्लॉगवर टाकली आणि जगभरच त्याने (विकृत) प्रसिद्धी मिळवली. अनेक तरुण व्यंगचित्रकारांचे स्वच्छ मत असे आहे की, घटनेवर भाष्य करू पाहणाऱ्या या चित्रांना वैचारिक पातळी नाही. अत्यंत हिडीस पद्धतीने ती काढलेली आहेत. विचार तर नाहीच, पण चित्र

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

म्हणूनही ही व्यंगचित्रे चांगली नाहीत. आपल्या देशातल्या भ्रष्टाचाराला विरोध करण्याचे कलाकारांचे काही मार्ग आहेत. त्यात इतका भडकपणा आला तर मूळ मुद्दा बाजूला रहातो. हल्लीची तरुण पिढी झटपट प्रसिद्धीसाठी काहीही करते त्यातला हा प्रकार आहे. अशा आशयाच्या चांगल्या व्यंगचित्रकारांच्या अनेक मुलाखती या प्रकरणाच्या दरम्यान माध्यमांमधून येऊन गेल्या.

असीम त्रिवेदीच्या या प्रकरणातील त्याला झालेली अटक, पोलीस कोठडी, पोलीसांची मारहाण, जामीन नाकारण्याची त्याची भूमिका हे सर्व तपशील या प्रकरणाला असणाऱ्या बाजू आहेत. आविष्कार स्वातंत्र्य किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्य या मूळ संकल्पनांच्या संदर्भात या घटनेचा विचार केल्यास, व्यंगचित्र या कलेकडे पाहण्याची जाण कशाला म्हणावे हा प्रश्न उपस्थित होईल. व्यंगचित्रकारानेच नव्हे तर कोणत्याही कलाकाराने आपल्या कलाविष्कारातून सामाजिक, राजकीय, धार्मिक विषयांवर टीका करायची असेल तर अभिरुची सोडून हीनतेच्या कमाल पातळीवर जाता कामा नये. असीम त्रिवेदीच्या बाबतीत हे घडले आहे. व्यंगचित्रे ही नावाप्रमाणेच व्यंग म्हणून पाहण्याची रसिकाची विनोद बुद्धी ही देखील परिपक्व असायला हवी. जरा काही खुट्ट झाले की मोर्चा निषेध अशा चक्रातून असे विषय या कलाकाराला अनावश्यकरित्या मोठे करतात. या महानतेचा कैफ या कलावंताला चढतो आणि अशा प्रकारची दर्जाहीन चित्रे तो काढतो. आंतरजालवरील सामाजिक संपर्क यंत्रणांमुळे (सोशल नेटवर्कींग) अशी चित्रे, असे लेखन क्षणभरात जगात सर्वत्र पसरते आणि त्यावर प्रतिक्रिया यायला सुरुवात होते. ज्यांच्या पदरी कोणतेही कर्तृत्व नाही अशा माणसांच्या छाया चित्राला मग सोनेरी चौकट लाभते आणि अशी प्रकरणे आकारास येतात.

स्वातंत्र्याला व त्याचा वापर करणाऱ्यांना जबाबदारीचे भान असायलाच हवे. पण स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार करणाऱ्या लोकांना मात्र हे भान रहात नाही. मुळात या दोन संकल्पना इतक्या संवेदनशील आहेत आणि त्यांतील सीमारेषा इतक्या पुसट आहेत की स्वातंत्र्याचे स्वैराचारात कधी रूपांतर होईल हे सांगता येत नाही असे होऊ नये म्हणून कलाकारांची विवेकबुद्धी आणि तारतम्यांचे भान जागे असायला हवे. स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीचा विसर पडता कामा नये.

असीम त्रिवेदीच्या निमित्ताने आपल्या स्थानिक नेतृत्वाने देखील आत्मपरीक्षण करावे असे वाटल्या शिवाय रहात नाही. उत्सवांमध्ये अत्यंत हीन दर्जाच्या प्रकारांना ऊत आलेला असतो. 'कलेचा आविष्कार' या नावाखाली वाटेल ते चाललेले असते. याचा परिणाम समाजावर होत असतो. लहान मुले, वृद्ध माणसे यांचा विचार न करता हे तथाकथित नेते कलाहीन वातावरण निर्माण करतात. त्यामुळे त्यांनी आविष्कार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांचा अर्थ जाणून घ्यायला हवा. असीम त्रिवेदीसारख्या प्रकरणांतून घ्यावयाचा हा धडा आहे.

**- मोहन पाठक**

●●●

व्ही.पी.एम.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ९ / सप्टेंबर २०१२

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ३ रा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | रामरक्षा | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | केंब्रिजच्या सिडविक संग्रहालयाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ८ |
| ४) | महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | १२ |
| ५) | श्री रामचरित मानस | प्रा. सौ. श्री. मुजुमदार | १६ |
| ६) | स्वामी विवेकानंद | श्री. शं. बा. मठ | २१ |
| ७) | भारतीय संस्कृती-बीज, मंदिल व साधना | श्री. यशवंत साने | २६ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |
| ९) | रेनडियर | सौ. पूजा नाईक | ३८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# रामरक्षा

*सद्धर्म प्रकाशनाने पूर्वी प्रकाशित केलेल्या रामरक्षेचे व्याकरण या पुस्तकाची माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी लिहिलेली प्रस्तावना अतिशय वाचनीय व विचारप्रवृत्त करणारी आहे. 'दिशा' च्या वाचकांसाठी सदर प्रस्तावना येथे देत आहोत.*

हिंदूंच्या 'राम' या देवतेच्या संदर्भात इतके प्रचंड लिखाण झाले आहे की त्यांची पूर्णपणे नोंद घेणेही शक्य नाही. यातील फारच थोडा भाग छापील स्वरुपात उपलब्ध असून काही शेकड्यांनी हस्तलिखिते जुन्या ग्रंथालयांतून पडून आहेत.

मौखिक परंपरेने आलेली अनेक स्तोत्रे[१] व स्तवनपर काव्ये (लिहिली किंवा छापली न गेलेली) यांचा या साहित्यात समावेश होणेही कठीण आहे. या सर्व रामविषयक साहित्यात **रामायण** हे सर्वांत महत्त्वाचे व सर्वपरिचित महाकाव्य आहे. वाल्मिकी रामायणा व्यतिरिक्त इतर अनेक कविलिखित रामायणे आज उपलब्ध आहेत. बडोद्याच्या प्राच्य विद्या संस्थेनी रामायणाची संशोधित प्रत[२] काढण्याचा प्रयत्न केला आहे. रामायणांमधील कथांचा आधार अनेक पुराणांमध्ये घेतलेला आहे. या पुराणांमधून अनेक स्तोत्रे मिळतात. काही स्तोत्रे स्वतंत्रही रचिली गेलेली आहेत.

भक्ती चळवळीत अनेक स्तोत्रे लिहिली गेली. भौतिक गुणांच्या प्राप्तीकरिता पुढे ती नित्य नियमाने म्हणण्याचा प्रघात पडला. वेदांतस्तोत्रे मात्र मोक्षप्राप्तीकरिता लिहिली गेली. त्यांचा बाह्य तोंडवळा जरी भक्ती स्तोत्रांसारखा असला तरी बऱ्याच अंगांनी ती भिन्न वाटतात. तंत्रवाङ्मयातही स्तोत्रांची रचना आढळून येते. त्यांची उपयुक्तता मात्र भक्ती व वेदांत स्तोत्रांपेक्षा वेगळी सांगितलेली आहे.

रामरक्षा स्तोत्र[३] हे संस्कृत भाषेतील असेच महत्त्वाचे व अतिशय लोकप्रिय स्तोत्र. याचा सर्वाधिक प्रसार महाराष्ट्रातच दिसतो. तरीही या रामरक्षेची मूळ संहिता शोधण्याचा प्रयत्न फारच थोडा झाला आहे. आज उपलब्ध असलेली रामरक्षेची पुस्तके ही बहुतांशी रामरक्षेच्या श्लोकांपुरतीच मर्यादित आहेत. गेल्या १०० वर्षांत अशा रामरक्षा स्तोत्रांच्या अनेक छापलेल्या प्रती मिळतात. मराठीमध्ये तरी श्री. के. बी. दिवाण[४] यांनी अभ्यासपूर्ण

१) हिंदूंच्या स्तोत्रांबद्दलची अतिशय चांगली व विश्लेषणात्मक माहिती जे. होंडा यांनी संपादित केलेल्या 'ए हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर' या ग्रंथात मिळते - (खंड२, प्रकरण १४, मिडिवल रिलिजिअस लिटरेचर इन संस्कृत, पृष्ठ - २३२ - २५०); तसेच गुइन बुनेमन या जर्मन विदुषीने रामरक्षेवर लिहिलेल्या आपल्या प्रबंधातही स्तोत्रांबद्दल माहिती प्रस्तावनेत दिली आहे. (टीप ११ पहा); ज्ञानेश्वरांपासून महिपतीपर्यंत सर्व मराठी संतांची स्तोत्रे असलेला ग्रंथ, स्तोत्रमाला जस्टीन अॅबट या अभ्यासकांनी १९२९ मध्ये इंग्रजीमध्ये भाषांतरित करून पुण्याहून प्रकाशित केला आहे. याशिवाय अनेक स्तोत्र एकत्रित असलेले बृहद्स्तोत्ररत्नाकर इत्यादी ग्रंथ उपलब्ध आहेत.

२) दि वाल्मिकी रामायण (खंड १ ते ७) ओरिएंटल इन्स्टीट्यूट बडोदा

३) रामरक्षा स्तोत्राची हस्तलिखिते जरी भारतातल्या सर्व ग्रंथालयातून मिळत असली तरी महाराष्ट्रामध्ये ती संख्येने अधिक मिळतात. गुइन बुनेमन या विदुषीने आपल्या प्रबंधात वाई आणि पुणे येथून सुमारे ४० आणि वाराणसी व अयोध्या येथून ८५ हस्तलिखितांची नोंद घेतली आहे. रामरक्षेच्या छापील प्रती अनेक मिळत असल्या तरी महाराष्ट्रात विष्णु विनायक फाटक यांनी केलेलो सार्थ श्रीरामरक्षा हे पुस्तकच सर्वाधिक प्रसारात आहे. १९९७ साली आदित्य प्रतिष्ठान, पुणे यांनी श्री. रामस्तुती या प्रकाशित केलेल्या पुस्तिकेतही दुसऱ्या भागात रामरक्षा अभ्यास एवं मराठी अर्थासह छापली आहे.

४) के. बी दिवान, श्रीरामरक्षा स्तोत्र - एक अध्ययन, वर्धा, १९५५. हे पुस्तक अतिशय दुर्मिळ आहे.

प्रस्तावनेसह रामरक्षा स्तोत्र छापलेले दिसते. तसा दुसरा प्रयत्न श्री. नारायण अनंत गोरे[५] यांनी केलेला दिसतो. अन्यथा रामरक्षास्तोत्रावर संशोधनपर लिखाण मराठीमध्ये उपलब्ध नाही. वाईच्या विश्वकोशामध्येही रामरक्षा स्तोत्राची नोंद नाही. संस्कृतिकोशामध्ये[६] 'रामरक्षा स्तोत्र' या शिर्षकाखाली रामरक्षा स्तोत्राची नोंद आहे. पण तीही जुजबीच आहे. 'प्रसाद' मासिकाच्या नोव्हेंबर १९६९ च्या अंकामधील श्री. स. कृ. देवधर यांनी लिहिलेल्या लेखावरून त्यांच्याच नावाने ही नोंद संस्कृतिकोशात आढळते.

ऑगस्ट १९८० 'प्रसाद' मासिकाच्या श्रीराम दैवत विशेषांकात श्री. स. कृ. देवधर[७] व श्रीमत् स्वामी सत्यदेवानंद सरस्वती[८] यांचे रामरक्षेची माहिती देणारे दोन लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

श्री. डी. के. ओक[९] व पं. सातवळेकर[१०] यांचे रामरक्षेवरील लेख अनुक्रमे नोव्हेंबर १९४२ व जुलै १९५२ च्या 'पुरुषार्थाच्या' अंकात प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व लेखांमधून रामरक्षेबद्दल उपयुक्त माहिती मिळत असली तरी त्यात चिकित्सक संशोधन दिसत नाही. रामरक्षेवरील चिकित्सक संशोधनपर पहिले लिखाण १९८३ साली गुद्रुन बुनेमान[११] या जर्मन विदुषीने प्रथमच इंग्रजीमध्ये प्रसिद्ध केलेले दिसते.

आज सुमारे ११ वर्षे होऊन गेल्यावरसुद्धा, ज्या महाराष्ट्रामध्ये या रामरक्षेच्या स्तोत्राचा सर्वात आधिक वापर होत आहे तेथे अजून कुठल्याच मराठी वा संस्कृत संशोधकाला अभ्यासकांकरिता असे संशोधन हाती घ्यावे असे वाटत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

महाराष्ट्रात सध्या प्रचारात असलेले रामरक्षा स्तोत्र हे आनंद रामायणातून[१२] घेतल्याची नोंद सर्वांनी केली आहे. आनंद रामायणातील ५ वे कांड, 'जन्मकांड', यातील ५ वा सर्ग यामध्ये मूळरामरक्षा ५१ श्लोकांची आहे. परंतु सध्या प्रचलित एकूण ३८ श्लोकच आहेत. **आनंद रामायणाची**

---

५) नारायण अनंत गोरे, सार्थ श्रीरामरक्षास्तोत्र - संशोधनपूर्ण प्रस्तावनेसह. श्री. गोरे यांनी आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत बिकानेर येथील संग्रहातील संवत् १६७९ व १६९७ च्या पोथ्यांचा उल्लेख केला आहे. बहुधा रामरक्षेची ही सर्वात आधीची हस्तलिखिते असावीत.

६) भारतीय संस्कृतिकोश, ८ वा खंड, संपादक - पंडित महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, ४१० शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०, १९७४ पृष्ठ १३५ - १३६.

७) स. कृ. देवधर, श्रीरामरक्षा स्तोत्र प्रसाद, ऑगस्ट १९८०, पृष्ठ ११३ - १२८

८) श्रीमत्स्वामी सत्यदेवानंद सरस्वती, श्रीरामरक्षेचे गूढार्थचिंतन, प्रसाद, ऑगस्ट १९८०, पृष्ठ - १०६ ते ११२.

९) डी. के. ओक रामरक्षास्तोत्र संपूर्ण व शुद्ध संहितेची आवश्यकता, 'पुरुषार्थ' नोव्हेंबर १९४२, पृष्ठ १२७ ते १३२

१०) पंडित श्री. दा. सातवळेकर, रामरक्षा स्तोत्राचा विचार, 'पुरुषार्थ' जुलै १९५२, पृष्ठ - १२१ ते १२८

११) गुद्रुन बुनेमान, बुधकौशिकाज रामरक्षा स्तोत्र- ए कॉन्ट्रिब्युशन टू द स्टडी ऑफ संस्कृत डिवोशनल पोएट्री. प्रकाशन, डी नोबिली रिसर्च लायब्ररी (खंड१०), व्हिएन्ना १९८३.

१२) महाराष्ट्रामध्ये मध्व संप्रदायात आनंद रामायण मोठ्या प्रमाणात प्रचिलित आहे. आनंद रामायणाचा कर्ता हा वाल्मिकी असल्याचे जरी सांगितले असले, तरी वाल्मिकी रामायण लिहिलेला वाल्मिकी तो नक्कीच नाही. कारण आनंद रामायणाची निर्मिती साधारण १५ व्या शतकात झाली असावी असा अंदाज आहे. अध्यात्म रामायण हे आनंद रामायणाच्या आधीचे दिसते. कारण अध्यात्म रामायणातील काही भाग आनंद रामायणांत उधृत केलेला आहे. श्री. गोरे यांनी आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत गुजरात प्रिंटींग प्रेसने प्रकाशित केलेल्या बृहत्स्तोत्ररत्नाकर या पुस्तकातल्या २५१ व्या रामकवचाचे आनंद रामायणामधील रामरक्षा कवचाशी विलक्षण साम्य दाखविले आहे. तरीही कोणी कोणाची उसनवारी केली याकरिता आधिक संशोधनाची गरज आहे. आनंद रामायणाच्या आधिक माहिती करता महाराष्ट्रीय लिखित रामायण समालोचन अथवा रामायणाचा उपसंहार या पुणे येथून १९२७ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथाचाही अभ्यासकांना चांगला उपयोग होईल. (खंड २, पृष्ठ ४०९ ते ४२६)

---

मुंबईहून प्रकाशित झालेली, गोपाळ नारायण यांनी १९२६ साली संपादित केलेली आवृत्ती सध्या उपलब्ध दिसते.

प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे, या आमच्या संस्थेत उपलब्ध असलेली आनंदरामायणाची छापील पोथी भाटिया ज्ञातीय ठक्कर गोवर्धनदास लक्ष्मीदास यांनी मुंबई येथे जगदीश्वर छापखान्यात छापलेली आहे. ती शके १८०९ म्हणजेच इ. सन. १८८७ सालची आहे. आनंद रामायणाच्या छापील पोथ्यांतील ही सर्वात आधीची पोथी असावी असे वाटते. आनंद रामायणाच्या हस्तलिखित पोथ्या मात्र भारतातील हस्तलिखिते असलेल्या अनेक ग्रंथालयांतून उपलब्ध आहेत.

आनंद रामायणाप्रमाणेच रामरक्षा स्तोत्र **पद्मपुराणातही**[13] सापडते. पद्मपुराणाची हस्तलिखिते बरीच उपलब्ध असली तरी त्याची छापील पोथी मात्र पुण्याहून आनंदाश्रमाने १८९४ साली प्रकाशित केली आहे. श्री मंडलीक यांनी ती आवृत्ती संपादित केलेली आहे. (अध्याय ७४ वा). तसेच मुंबईच्या वेंकटेश्वर प्रेसने १८९५ साली गोविंदशास्त्री संपादित प्रत छापलेली आहे (अध्याय ७३ वा) श्री. ए. चतर्जी यांनी पद्मपुराणावर लिहिलेल्या एका लेखात (१९६७) पद्मपुराणाच्या अप्रकाशित बंगाली प्रतीचा उल्लेख केला आहे.

**बृहत्स्तोत्ररत्नाकर,** हा अनेक स्तोत्रे एकत्र संकलित करून देणारा स्तोत्रांवरील महत्वाचा ग्रंथ. याच्याही अनेक छापील प्रती आहेत. दुर्दैवाने या छापील प्रतींमधील रामरक्षा स्तोत्रांचा मूळ स्रोत वेगळा दिसतो. उदाहरणार्थ १९७८ साली श्री. शिवदत्त मिश्र शास्त्री यांनी संपादित केलेल्या व वाराणसीहून प्रकाशित झालेल्या या ग्रंथात वेंकटेश्वर प्रेसने छापलेल्या पद्मपुराणातील रामरक्षा घेतलेली दिसते तर १९२२ साली निर्णय सागर प्रेसने छापलेल्या बृहत्स्तोत्ररत्नाकर या ग्रंथामध्ये मात्र आनंद रामायणातील रामरक्षास्तोत्र छापलेले दिसते.

रामरक्षेवर गोमतीदास वैष्णव, धरणीधर पंत, गोविंददास मुद्गल भट्ट अशा ४ पंडितांनी टीका लिहिल्याचा उल्लेख श्री. ना. अ. गोरे यांनी आपल्या रामरक्षेच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत म्हटले आहे. गुड्रुन बुहेमन या जर्मन विदुषींनी रामरक्षेवरील आपल्या प्रबंधात निळकंठ चतुर्धर या आणखी एका टीकाकाराची माहिती दिली आहे. मुद्गल भट्ट यांच्या टीकेवरील त्यांच्या पुस्तकातील माहिती ही फारच अभ्यासपूर्ण आहे. गोमतीदास, धरणीधर पंत आणि गोविंददास यांच्या टीकांचा मात्र बाईंच्या प्रबंधात उल्लेख मिळत नाही. आणखीही काही टीका असण्याची शंका नाकारता येत नाही. या सर्वच टीकांचा चिकित्सक अभ्यास होणे आज आवश्यक आहे.

**'अगस्त्य संहिता'**[14] आणि **'रामरक्षाप्रयोग'**[15] या दोन ग्रंथामध्ये रामरक्षा यंत्राबद्दल माहिती मिळते. आनंदवन लिखित **'रामर्चनचंद्रिका'** या ग्रंथातही यंत्र बघायला मिळते. अर्थातच या कुठल्याच ग्रंथामधील यंत्रे

---

१३) पद्म पुराणाचीही संशोधित प्रत उपलब्ध नाही. ए. चतर्जींचा १९६७ साली कलकत्याहून प्रकाशित झालेल्या पद्मपुराण - ए स्टडी हा ग्रंथ हा अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.

१४) अगस्त संहितेचीही संशोधित प्रत उपलब्ध नाही. तसा प्रयत्न सध्या ग्रॅनिंगन, हॉलंड येथे चालू असल्याचे समजते. अगस्त संहिता आणि रामभक्तीच्या संप्रदायाकरिता हंस बाकर यांनी १९८१ साली वाराणसी येथे भरलेल्या ५ व्या जागतिक संस्कृत परिषदेमध्ये वाचलेला, द अगस्त संहिता अँड द हिस्टरी ऑफ द रामकल्ट हा शोध निबंध अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.

१५) रामरक्षा प्रयोगांचे श्लोक संपादित करून 'रामकवच' म्हणून बृहद् स्तोत्ररत्नहारामध्ये ते समाविष्ट केले गेले आहेत. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळ (पोथी क्र. ३७/८९६) तसेच मुंबईच्या एशिआटिक सोसायटीच्या हस्तलिखित संग्रहात (खंड २ पृष्ठ २६९-७०, पोथी क्र. ८६७) रामरक्षा प्रयोगाच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध आहेत.

---

सुडाचा विचार करणारा माणूस स्वत:चा अपमान कुरवाळत असतो. - फ्रान्सिस बेकन

तंतोतंत एकमेकांशी जुळत नाहीत. 'रामरक्षा यंत्रराज' या शीर्षकाचे ताम्रपत्रावर छापलेले एक यंत्र अलिकडेच मुंबईच्या गजानन बुक डेपोने प्रसारित केले आहे.

हिंदू धर्माचा प्रभाव भारता बाहेरही मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. विशेषत: दक्षिणपूर्ण आशिया खंडातील देशांमध्ये रामायणाचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. अभ्यासकांना बाली इंडोनेशिया[१६] येथेही रामरक्षेचे हस्तलिखित उपलब्ध झाले आहे.

रामरक्षास्तोत्र हे वैदिक आणि तांत्रिक प्रवाहांचे एक सुंदर मिश्रण आहे. हे स्तोत्र 'मंत्र' असल्याचे रामरक्षेच्या सुरुवातीलाच सांगितले आहे, आणि म्हणूनच मंत्राच्या सुरुवातीला मंत्राचा ऋषि, छंद, देवता, विनियोग, बीज, शक्ती आणि कीलक इ. रामरक्षेच्या पहिल्या श्लोकातच देण्यात आहेत. कुठलाही मंत्र हा अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने उच्चारावा लागतो. तसेच मंत्र म्हणायची वेळ, आसन व उच्चार पद्धती या सर्व नियमांचेही कसोशीने पालन करावे लागते. रामरक्षा स्तोत्राची अनेक आवर्तने करून ईप्सित फलप्राप्ती करून घेण्याचेही अनेक प्रकार सांगितले आहेत. मंत्र नुसता म्हणून भागत नाही. तो सिद्ध[१७] करावा लागतो. त्याच्याही अनेक पद्धती सांगितल्या गेल्या आहेत. रामरक्षा स्तोत्र हे प्रामुख्याने कुठल्याही व्यक्तीच्या रक्षणाकरिता म्हटले जाते, म्हणूनच ते एका 'कवचाचे' काम करते. खरे म्हणजे हे कवचाचे श्लोक -

शिरो मे राघव: पातु भालं दशरथात्मज: ।।४।।

कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रिय: श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सल: ।।५।।

जिह्वां विद्यानिधि: पातु कण्ठं भरतवन्दित: ।
स्कन्धौ दिव्यायुध: पातु भुजौ भग्नेशकार्मुक: ।।६।।

करौ सीतापति: पातु हृदयं जामदग्न्यजित् ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रय: ।।७।।

सुग्रीवेश: कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभु: ।
ऊरू रघूत्तम: पातु रक्ष: कुलविनाशकृत् ।।८।।

जानुनी सेतुकृत्पातु जङ्घे दशमुखान्तक: ।
पादौ बिभीषणश्रीद: पातु रामोऽखिलं वपु: ।।९।।

या रामरक्षा स्तोत्राच्या अकरा ओळी पुरतेच मर्यादित आहेत. डोक्यापासून ते पायापर्यंतच्या सर्व अवयवांचे रक्षण राम करो अशीच ही प्रार्थना आहे. प्रत्येक अवयवाकरिता रामाचे एक विशेष स्वरूप (नाम) जे या प्रार्थनेत सांगितले आहे त्यामध्येही अत्यंत खुबीने वाल्मिकी रामायणामधील रामाच्या चरित्राचा कालक्रमच देण्यात आला आहे.

रामो राजमणि: सदा विजयते रामं रमेशं भजे
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नम: ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं
रामे चित्तलय: सदा भवतु मे भो राम मामुद्धर ।।३७।।

या रामरक्षेच्या चार ओळीमध्ये 'राम शब्दाची प्रथमेपासून संबोधनापर्यंतची सर्व विभक्तींची एकवचनी रूपे क्रमाने दिली आहेत.

या पुस्तकाचे लेखक श्री. दिनकर दामोदर औटी यांनी हे पुस्तकच मुळी रामरक्षा स्तोत्राच्या माध्यमातून, यातील व्याकरण समजावून सांगण्याकरिता लिहिले आहे. हा प्रयोग नवीन आहे. याआधी रामरक्षेवर अशा प्रकारे लिखाण

---

१६) टी गौड्रीयान आणि सी हुकास या अभ्यासकांनी बालीमधे उपलब्ध झालेल्या रामरक्षास्तोत्राचा चिकित्सक अभ्यास आपल्या १९७१ साली प्रकाशित झालेल्या स्तुति अँड स्तव (बौद्ध, शैव अँड वैष्णव) ऑफ बलिनिज ब्राह्मण प्रिस्टस् या ग्रंथात केला आहे. (पृष्ठ १४२ - १४४, रामकवच शीर्षकाखाली) बालीमधील उपलब्ध झालेला काळ अभ्यासकांच्या मते १२ वे शतक किंवा त्या आधीचा असावा.

१७) स. कृ. देवधर यांच्या प्रसाद मधील लेखात (पृ. ११५) या संबंधी बरीच माहिती दिली आहे. (टिप नं. ७ पहा.)

झालेले दिसत नाही. लेखकाने या पुस्तकाच्या मनोगतात आपली भूमिका विस्तृतपणे मांडली आहे.

'सद्धर्मने' याआधीही पुष्कळ प्रबोधनात्मक लिखाण प्रकाशित केले असून आपण नेहमीच त्याचे स्वागत केले आहे. यातून स्फूर्ती घेऊन हेही पुस्तक प्रकाशित करीत आहोत. धन्यवाद!

**डॉ. विजय बेडेकर**
शिवशक्ती, महर्षी कर्वे रोड,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

●●●

## काम हाच देव

आपण करत असलेल्या कामाचा आनंद घेतला पाहिजे. तुम्ही ऑफिसमधील कोणतेही काम करत असा, बागकाम करत असा किंवा अभ्यास करत असा त्यात स्वतःला पूर्ण झोकून द्या. त्या कामाला कधी तरी फळ येईल आणि त्या फळाचा आपल्याला असा वापर करता येईल वगैरे दिवास्वप्न बघू नका. ते फळ मिळत नाही, तेव्हा होणारी निराशा खूप असते. आपली कामावर श्रद्धा असेल आणि फळापासून 'डिटॅचमेंटची सवय असेल, तर मग तुमच्यासारखे तुम्हीच. ही सवय लागली, की मग अनपेक्षितरीत्या मिळालेल्या लाभाचा आनंद अधिक वाटतो. कामातच जास्त लक्ष असेल, तर त्या कामाची परिणामकारकता वाढते, आपले मन जास्त रमते, ताण कमी होतात आणि तणावमुक्त आयुष्याचा लाभ घेता येतो.

- संग्रहातून

## विज्ञान तंत्रज्ञाची प्रसिद्धी

विज्ञान तंत्रज्ञानाचा आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वापर आपण पाहतोच दूरसंचासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध माध्यमांत वर्तमानपत्रे हे अतिशय जुने व पारंपरिक साधन आहे. वर्तमानपत्रांतून विज्ञान व तंत्रज्ञान आणि खगोल शास्त्रास किती स्थान मिळते याबद्दलचे एक छोटे टिपण करंट सायन्सच्या मेच्या एका अंकात आले आहे. यात फक्त इंग्रजी भाषेतील काही वृत्तपत्रांचा विचार केला आहे.

त्याचे विश्लेषण करताना संशोधक द्वयींनी अशी नोंद केली आहे की राष्ट्रीय स्तरावरील ३७ वृत्तपत्रांचे त्यांनी (१ एप्रिल ते ३० सप्टेंबर २००८ या कालावधीतील) सर्वेक्षण केले. यात विज्ञान तंत्रज्ञानाशी संबंधित ५३८५ वृत्तांत हा उल्लेख आहे. या वृत्तांची एकूण जागा ९८६,५३४ चौरस सेंटिमीटर झाली होते. आरोग्य विषयक वृत्तांना सर्वांत जास्त प्रसिद्धी मिळाली. त्याखालोखाल पर्यावरण व खगोलशास्त्रांना प्रसिद्धी मिळाली आहे.

भारवी दत्त व के. सी. गर्ग यांनी याबाबत CSIR च्या तंत्रज्ञान व प्रगती अभ्यास केंद्रातून हा अभ्यास केला आहे. या अभ्यासाच्या उदाहरणावरून भावी वृत्तपत्रांचे विश्लेषण करणे शक्य आहे.


संदर्भ - करंट सायन्स खंड १०२ अंक क्र. ९, १० मे २०१२, पृ. १२४५

# केंब्रिजच्या सिडविक संग्रहालयाला भेट

*भूगर्भ शास्त्राबाबत उत्सुकता निर्माण करणारं सिडविक संग्रहालय डॉ. आगरकरांनी नेमक्या व मोजक्या शब्दांत या संग्रहालयाचा करून दिलेला हा परिचय – संपादक*

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे दरवर्षी विद्यार्थ्यांची इंग्लंडला शैक्षणिक सहल आयोजित करते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या शहरातील निवडक संग्रहालयांना भेटी दिल्या जातात.केंब्रिजमध्ये अनेक संग्रहालये आहेत. त्यांतील सर्वात मोठे संग्रहालय म्हणजे भूगर्भशास्त्र संग्रहालय. त्याचे नांव सिडविक भूविज्ञान संग्रहालय (Sedgewick Museum of Earth Sciences) असे आहे. केंब्रिज विद्यापीठ परिसरात संग्रहालयासाठी एक वेगळी जागा राखून ठेवलेली आहे. त्या संग्रहालय संकुलातच हे संग्रहालय आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाला ते लागून आहे. लालसर रंगाच्या दगडी इमारतीने वेढलेल्या या संकुलात आपण प्रवेश करताच संग्रहालयाची भव्यता आपल्या लक्षात येते. संग्रहालय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आहे. जिना चढून आपण वर गेलो की भव्य प्रवेशद्वार आपल्या नजरेस पडते. येथूनच आपण संग्रहालयात प्रवेश करतो. प्रवेश विनामूल्य आहे.


प्रवेशद्वाराजवळच डायनासोरचा एक भव्य सांगाडा आहे. आमच्या सोबतच्या विद्यार्थ्यांनी या सांगाड्याजवळ उभे राहून आपले फोटो काढून घेतले. त्यानंतर ते जवळच असलेल्या संग्रहालयाच्या विक्री केंद्राकडे जाऊ लागले. आधी संग्रहालय पाहू आणि जाताना खरेदी करू असे सांगितल्यावर सगळेजण तेथून बाहेर पडले. प्रवेशद्वाराजवळच एक टेबल ठेवलेले आहे. या टेबलावर संग्रहालयाची रचना दाखविणारी पत्रके असतात. हे पत्रक पाहून कोणत्या विभागात काय आहे याची आपल्याला कल्पना येते. त्यानुसार आपण हव्या त्या विभागात जाऊ शकतो. आम्ही मात्र संपूर्ण संग्रहालयच पाहायचे असे ठरविले आणि डावीकडे वळलो.



प्रवेशद्वार

पहिला विभाग आहे गाळाच्या खडकांचा. येथे वेगवेगळ्या भागांतून आणलेले गाळाचे खडक पाहायला मिळतात. समुद्रात गाळ साचत जाऊन हे खडक बनतात. यात शंख, शिंपले आले की त्यांचा आकार या दगडांना देतो. अशा प्रकाराचे अनेक खडक आपल्याला येथे पाहायला मिळतात.


खडकांना स्पर्श करण्याची, त्याचबरोबर त्यांचे छायाचित्र काढण्याची मुभा आहे. ही गोष्ट विद्यार्थ्यांना फारच आवडली. प्रत्येक दगडाजवळ ते कोठून मिळवले, त्याचे वैशिष्ट्य काय याची जुजबी माहिती आहे. शाळेत एखादा निष्क्रिय विद्यार्थी असेल तर त्याला दगड म्हणण्याची प्रथा आहे. येथले दगड तर आपली माहिती देत होते.




विविध दगडांचे नमुने व त्यांची माहिती

दगडांचा विभाग आटोपून आम्ही जीवाश्माच्या विभागात आलो. येथे मोठमोठ्या आकाराचे जीवाश्म आहेत. समुद्रात खडक तयार होताना जर एखादा सजीव त्यात आला तर त्याच्याभोवती गाळ साचून खडक तयार होतो. कालांतराने सजीवाच्या पेशी कुजतात. परंतु त्यांचा आकार मात्र खडकांवर कायमचा कोरला जातो. अशा प्रकारचे खडक फारच दुर्मीळ असतात. परंतु या संग्रहालयात मात्र अनेक प्रकारचे जीवाश्म पाहायला मिळतात. यांत मासे, कासव, सरडे, मगर अशा अनेक प्राण्यांचे आकार असलेले जीवाश्म आहेत. यांचे सादरीकरण फारच प्रभावी आहे. यांतील काही काचेच्या कपाटात आहेत तर काही उघड्यावर आहेत. उघड्यावर असलेले जीवाश्म चबुतरा बांधून त्यांतील वैशिष्ट्यपूर्ण बाबी स्पष्ट दिसतील या पद्धतीने ठेवलेले आहेत. सर्व जीवाश्मांवर पुरेसा उजेड पडेल अशी व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे प्राण्यांचे आकार आपल्याला स्पष्टपणे पाहायला मिळतात. हा विभाग इतका प्रभावी आहे की येथून सरकावे असे वाटतच नाही.

जीवाश्म विभाग संपवून दुसऱ्या विभागात जाण्यासाठी काही पायऱ्या चढाव्या लागतात. या विभागाचा वेगळेपणा दाखविण्यासाठी तेथे प्रवेशद्वार केलेले आहे. या प्रवेशद्वाराजवळच प्रा. सिडविक यांचा पुतळा आहे. ते स्वत: भूगर्भशास्त्रज्ञ होते. जगातील वेगवेगळ्या खडकांचा संग्रह करण्याची त्यांची सवय होती. या संग्रहालयात त्यांनी गोळा केलेले अनेक खडक आहेत. भूगर्भशास्त्रातील त्यांचे योगदान आणि त्यांचा दगड गोळा करण्याचा छंद यांचा सन्मान म्हणून या संग्रहालयाला त्यांचेच नाव देण्यात आलेले आहे.






संग्रहालयातील काही जीवाश्म

पायऱ्या चढून आपण एका मोठ्या दालनात येतो. दोन्ही बाजूला कपाटात अनेक प्रकारचे दगड ठेवलेले आहेत. एकेक कपाट जगातल्या एकेका विभागासाठी आहे. भूमध्य समुद्रात आढळणाऱ्या खडकांचे नमुने एका कपाटात आहेत तर अटलांटिक समुद्रात आढळणारे खडकांचे नमुने दुसऱ्या कपाटात आहेत. अशा प्रकारे जगातील वेगवेगळ्या सागरात आढळणारे खडक वर्गीकरण करून ठेवलेले आहेत. सागरातील खडकांबरोबरच जगाच्या विविध

उत्साहाने मन लावून काम करण्यात आणि अंगावर पडले म्हणून काम करण्यात विजय आणि पराजय इतके अंतर आहे.


भागांत जमिनीवर आढळणाऱ्या खडकाचे नमुनेदेखील येथे ठेवलेले आहेत. त्यात उत्तर अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका अशा वेगवेगळ्या खंडातील दगडांचे नमुने आहेत. एक खंड जरी घेतला तरी त्यात किती विविधता आढळते! ही सगळी विविधता आपल्याला एकाच ठिकाणी पाहायला मिळते.



वेगवेगळ्या खडकांचे नमुने

माणसाने खडकांचा उपयोग घर सजवटीसाठी मोठ्या शिताफीने करून घेतलेला आहे. त्यातल्यात्यात संगमरावर त्याचे फार प्रेम. संगमरवर तर किती प्रकारचे? त्याला गुळगुळीत केल्यावर ते कसे दिसतात याचे प्रत्यंतर आपल्याला या संग्रहालयात येते. त्यानंतर माणसाच्या आवडीचा दगड म्हणजे ग्रॅनाईट हा पॉलीश करून वेगवेगळ्या कामांसाठी वापरतात. आपल्याकडे ग्रॅनाईटचा उपयोग करून स्वयंपाकघरातील ओटे बनविले जातात. ग्रॅनाईट खडकाचे अनेक नमुने येथे ठेवलेले आहेत. मूळ दगड कसा दिसतो आणि दगड कापून पॉलीश केल्यावर कसा दिसतो याची कल्पना यावी म्हणून ते शेजारी शेजारी ठेवलेले आहेत. याचबरोबर कडप्पा, पाटीचा दगड, शहाबादी फरशी असे अनेक प्रकारचे दगड येथे आपल्याला दोन्ही रूपांत पाहायला मिळतात.

दगडांचा हा मोठा विभाग आटोपून आपण प्रवेश करतो तो एका बंद खोलीत. हा विभाग आहे स्फटिकांचा. निसर्गात अनेक संयुगे स्फटिकरूपात आढळतात. त्यांचे नमुने येथे ठेवलेले आहेत. एका लहानशा पेटीत मोठ्या आकाराचा स्फटिक ठेवलेला असून त्याच्या बाजूला त्याची रचना दाखविलेली आहे. त्याचबरोबर स्फटिकाची थोडक्यात माहिती दिलेली आहे. अशा पद्धतीने सर्वत्र काचेच्या पेट्याच पेट्या दिसतात. आपल्या नजरेपुढे येतील अशा पद्धतीने त्यांची रचना केलेली असून त्यावर पुरेसा उजेड पडेल अशीही व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे स्फटिकांचे निरीक्षण तर करता येतेच त्याचबरोबर त्याची माहितीदेखील वाचता येते. स्फटिकरूपात आढळणारी सर्व संयुगे येथे आहेत. पोटॅशियम नायट्रेट, कॉपर सल्फेट, कॅल्साईट, ॲलम अशा अनेक संयुगांचा यामध्ये समावेश आहे. एवढे स्फटिक एकत्रपणे पाहण्याची ही आमची पहिलीच संधी होती. त्यामुळे या विभागात आम्ही बराच वेळ खर्च केला. तरी सर्व माहिती वाचणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही त्यांची छायाचित्रेच काढून घेऊन आलो. त्यांतील काही छायाचित्रे खाली दिलेली आहेत.



रंगीबेरंगी स्फटिकांचे प्रदर्शन

जो चित्ताची एकाग्रता सिद्ध करू शकत नाही, तो प्रज्ञेच्या, अर्थात निर्मळ बुद्धीच्या मंदिरात प्रवेश करू शकत नाही– गौतम बुद्ध

शालेय विद्यार्थ्यांमध्ये भूगर्भशास्त्राबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी हे संग्रहालय प्रयत्नशील असते. एखाद्या शाळेने आधी कळविले तर विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. संग्रहालयातील वस्तू दाखविण्याखेरीज वेगवेगळे खेळ त्यांच्यासाठी आयोजित केले जातात. एखादा दगड कापून त्याला पॉलीश कसे करतात याचे प्रात्यक्षिक दाखविले जाते. खडकांचे निरीक्षण कसे करावे, त्याच्या वैशिष्ट्यावरून तो जगाच्या कोणत्या भागातील असेल याबद्दल अंदाज कसा बांधावा याची माहिती दिली जाते. दगडाची मैत्री आणि दगडाशी संभाषण हा या भेटीमागचा उद्देश असतो. आमच्या तीन तासाच्या भेटीत आम्हांला तोच अनुभव आला.

प्रवेशद्वारातून आत शिरल्याबरोबर विद्यार्थी विक्रीकेंद्रात शिरले होते. त्यावेळेस त्यांना तेथून बाहेर काढावे लागले. संग्रहालय पाहून झाल्यावर मात्र सर्वांना विक्रीकेंद्रात जाण्याची परवानगी देण्यात आली. तेथे लहान लहान जीवाश्म दगड, गुळगुळीत केलेले दगड, रंगीबेरंगी स्फटिक विक्रीला ठेवलेले होते. सिडविक संग्रहालयाची आठवण म्हणून प्रत्येकाने एकेक वस्तू खरेदी केली आणि आम्ही संग्रहालयाच्या बाहेर पडलो.

डॉ. सुधाकर आगरकर
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,काटई,
ता. कल्याण,जि. ठाणे - ४२१२०४

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# शिक्षणाचे दहा गाभा घटक

शिक्षण ही सातत्याने आजीवन चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे त्यांचा विचार नव्या प्रस्थापित झालेल्या प्रवाहांच्या संदर्भात केलेला आहे. विषयानुरूप हे गाभा घटक प्रतिबिंब झाले आहेत. हे दहा गाभा घटक खालीलप्रमाणे आहेत :

(१) भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास
(२) भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या
(३) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय
(४) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा
(५) समता, धर्मनिरपेक्षता व लोकशाही
(६) स्त्री-पुरुष समानता
(७) पर्यावरणाचे संरक्षण
(८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन
(९) छोट्या कुटुंब प्रमाणकाचे पालन
(१०) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपोष

दहा गाभा घटकांचा परिपोष करताना नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्याच्या दृष्टीने नवीन अभ्यासक्रमात दखल घेण्यात आली आहे. शिक्षण प्रक्रियेचा भर 'उत्तमतेचे' ज्ञान करून देणे असा आहे. उत्तमतेच्या ज्ञानाबरोबर 'उत्तमतेवर' प्रेम करणारा आणि 'उत्तम' कार्य करणारा विद्यार्थी व पर्यायाने नागरिक निर्माण करणे, हे शिक्षण प्रक्रियेचे ध्येय आहे.

-संग्रहातून

# महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा

लेखांक-२

*योगी अरविंदांचे समाजाबाबतचे चिंतन हा विषय फार मोठा व गहन आहे. प्रस्तुत लेखात अरविंदांच्या चिंतनाचा काही भाग स्पष्ट केला आहे. - संपादक*

मागील लेखामध्ये सामाजिक सभ्यतेच्या पहिल्या दोन टप्प्यांची वैशिष्ट्ये आपण पाहिली. टायपल एजच्या अखेरीस उदात्त अशा आदर्शांचं मूळ खोल कुठे तरी दृष्टिआड होऊ लागतं. उरतात ती फक्त बाह्य अवडंबरं. समाज फक्त रूढी आणि परंपरा पाळण्यात मश्गूल राहतो आणि मग हळू हळू समाज Conventional अथवा परंपरा प्रधान या तिसऱ्या टप्प्यावर जाऊन पोहोचतो.

**Conventional Stage अथवा परंपराप्रधान युग-**

या काळात समाज आपल्या जीवनाला एक घट्ट असे साचेबंद रूप देतो. अधिकार परंपरांची एक पद्धत निर्माण करतो. शिक्षण हे परंपरागत व न बदलणाऱ्या पद्धतीला जखडून ठेवलं जातं. धर्मपालनाचा एक ठराव काटेकोर आणि कठोर साचा निर्माण केला जातो.



अलीकडे दूरदर्शनवर चालू असलेल्या ''उंच माझा झोका'' या मालिकेच्या द्वारा आपल्याला याच परंपराप्रधान युगाचं दर्शन घडतंय. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि धर्मशास्त्र यांनी प्रभावित झालेला, जखडून ठेवलेला समाजातील एक फार मोठा वर्ग आपल्या रूढी आणि परंपरा यांना घट्ट धरून बसला आहे. नवशिक्षणाच्या माध्यमातून पुढे आलेल्या नवमतवादामुळे आपला धर्म बुडेल अशी या धर्ममार्तंडाना भीती वाटते. विशेष म्हणजे खाईत पडलेल्या ज्या दुर्दैवी स्त्रियांना हा नवमतवाद आधार देऊ पहातो आहे, त्याही स्त्रिया या नवविचारांना प्राणपणाने विरोध करताहेत. म्हणूनच श्री अरविंद म्हणतात -

"Hard is the word & redeemer's heavy task
The world itself becomes its adversary
Those he would save are his antogonist
This would is in love with its own ignorance"

हे जग आपल्या अज्ञानावरही प्रेम करतं आणि त्यामुळे निर्माण झालेल्या दुःखातही सुख मानतं आणि त्यामुळे या जगाला वाचवू पाहणाऱ्यांचं काम अवघड बनतं. समाजसुधारक ज्यांना वाचवू पाहतो, तेच त्याचे विरोधक बनतात आणि म्हणून श्री अरविंद म्हणतात की प्राचीन काळात होऊन गेलेल्या क्रान्तिकारक-तत्त्ववेत्त्यांची हा समाज पूजा बांधतो, त्याला देव मानतो. मात्र वर्तमानकाळातील क्रान्तिकारक विचारवंतांचे विचार त्याला मानवत नाहीत, त्याच्या पचनी पडत नाहीत आणि म्हणून तो त्याला ठेचून काढतो.

मात्र असं जरी असलं तरी हा समाज एका चौकटीत व्यवस्थित बांधलेला असतो. शास्त्रवचनांनी सीमित केलेला माणूस आणि समाज भरकटून जात नाही. त्यामुळे आणि त्या काळात निर्माण होणाऱ्या काही श्रेष्ठ दर्जाच्या काव्यकृती अथवा शास्त्रनिर्मितीकडे बोट दाखवून त्यास सुवर्णकाळही मानला जातो. वस्तुतः ते सोनं नसतं, सोन्याचा

मुलामा दिलेलं नाव असतं. कारण ज्या सत्याच्या शोधासाठी समाज धडपडत असतो. ते सत्य केवळ परंपरा पाळून हाताला लागत नाही.

या रूढी आणि परंपरा यांचा जेव्हा अतिरेक होऊ लागतो, सत्य आणि पारंपरिक विचार यांमधील दरी रुंदावत जाते तेव्हा विचारवंतांचा असा एक वर्ग निर्माण होऊ लागतो की जो या रूढी आणि परंपरा यांना झुगारून देतो. परंपरांचा अर्थ विचारू लागतो आणि वैयक्तिक तर्कशास्त्र, नैतिकतेची जाणीव आणि भावनिक इच्छा यांच्या आधारे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो आणि मग यातूनच समाज पुढील टप्प्यावर जाऊ लागतो.

**Individualism Age अथवा व्यक्तिप्रधान युग-**

हा पुढील टप्पा असतो.-Individualism चा व्यक्तिप्रधान जीवनाचा, वैचारिक बंडखोरीचा, वैचारिक स्वातंत्र्याचा आणि वैचारिक प्रगतीचा.

मानवी समाज या टप्प्यावर जाऊन पोहोचतो किंबहुना मानवामध्ये वैचारिक बंडखोरीचा प्रादुर्भाव होतो त्याचं मुख्य कारण म्हणजे परंपराप्रधान टप्प्याचं अपयश. परंपरांचे पालन करताना हळूहळू या परंपरा का निर्माण झाल्या कशासाठी निर्माण झाल्या त्याचा मानवाला विसर पडतो. एवढंच नव्हे तर हळूहळू या परंपरांना विकृत स्वरूप येऊ लागतं. नीतिमूल्यांचं अवमूल्यन होऊ लागतं. थोडक्यात आज आपल्याही समाजाची तीच स्थिती होत चालली आहे आणि मग अशा परिस्थितीत जीवनमूल्यांची पुनर्स्थापना नव्या आविष्कारात, कालानुरुप करण्याची आवश्यकता जाणवू लागते आणि त्यातूनच वैचारिक बंडखोरीचा उगम होतो. सामाजिक मन हे मूलतः आहे. तरीपण जेव्हा सत्य दिसत नाही, सापडत नाही, आपण असत्यावर जगत आहोत याची जाणीव तीव्र होते. तेव्हा त्या सत्याच्या शोधासाठी मानव अधिकाधिक स्वकेन्द्रित होऊ लागतो. स्वतःचं तर्कशास्त्र वापरून तो स्वतःचे आदर्श निर्माण करू पाहतो आणि मग स्वतःसाठी आणि साऱ्या जगासाठी हाच कायदा आदर्शभूत आहे असे तो मानू लागतो.

श्री अरविंद म्हणतात की पाश्चिमात्य देशांत आलेला व्यक्तिप्रधान जीवनाचा टप्पा हा तेथील जीवनातून निर्माण झालेला एक नैसर्गिक परिपाक होता. त्याला यावेळी जोड मिळाली ती भौतिक विज्ञानातील प्रगतीची. या प्रक्रियेत पहिला हल्ला सुरू होतो तो धर्मानं, धर्मगुरूंनी निर्माण केलेल्या परंपरांवर, नियमावलींवर. त्यांतील फोलेपणा, जाचकता यांना मानव नाकारू लागतो. त्यामागील सत्याचा ज्यांनी शोध घेतलेला नसतो त्या धर्मगुरूंचं पितळ उघडं पडतं. ''ही परमेश्वराची आज्ञा आहे.'' असं जरी सांगितलं तरी बंडखोर मानव ते मानत नाही, परंपराप्रधान युगात चालू असलेला खोटेपणा, भंपकपणा नष्ट करणं हे त्याचं काम असतं.

अशा तऱ्हेने वाटचाल करणाऱ्या युगाला दोन गोष्टींची गरज असते. एक म्हणजे अशा प्रकारचं सत्य की जे कुणालाही पडताळून पाहणं शक्य होईल आणि दुसरी गोष्ट म्हणजे अशा प्रकारची समाजव्यवस्था की जी अशा प्रकारच्या सत्यावरच आधारलेली असेल. १९ व्या शतकात भौतिकशास्त्राने घेतलेली झेप आणि डार्विनचा सिद्धांत या दोन घटनांमुळे व्यक्तिप्रधानतेकडे वाटचाल करणाऱ्या मानवाला भौतिक शास्त्राच्या रूपानं पहिलं सत्य गवसलं. हे सत्य कोणत्याही पोथी पुराणांत सांगितलं नव्हतं. त्यातील तत्त्व, कायदे साऱ्या साऱ्या गोष्टी मानवाला पडताळून पाहता येत होत्या. परंतु अशा प्रकारच्या सत्यावर आधारलेली समाजव्यवस्था जेव्हा उभी राहिली तेव्हा त्या व्यवस्थेनं साऱ्या जगातील बुद्धिवादी, व्यक्तिप्रधान आणि केवळ भौतिक विकासावरच श्रद्धा ठेवणारा मानवसमूह हर्षभरित झाला. पण हीच व्यवस्था त्यांच्या व्यक्तिप्रधान संकल्पनेवर घाला घालत आहे. हे जेव्हा त्याला उमगलं तेव्हाच व्यक्तिप्रधान युगाला धक्का बसला. कारण त्या व्यवस्थेचा पाया होता संपूर्ण समाजावर आधारित. त्यात

गंभीर होण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे विनोद.

व्यक्तीला काडीचीही किंमत नव्हती. पुढे ही व्यवस्था जरी कोलमडून पडली तरी Individualistic विचारधारेचा जगावरील प्रभाव मात्र कायम राहिला. त्यातून काही चांगल्या गोष्टीही घडल्या. जगाच्या निरनिराळ्या भागांतील दलित उपेक्षित वर्ग होता, त्यास प्रगतीची दारं उघडली गेली.

अशा तऱ्हेने व्यक्तिप्रधान युग हे समाजावर निरनिराळ्या पद्धतीने आपला प्रभाव पाडत असले तरी शेवटी त्यास चिरंतन सत्य गवसणे शक्य नसते. भौतिक शास्त्राच्या सहाय्याने जीवन जरी काही काळ सुखकर झाल्यासारखे वाटले तरी त्यातून अनेक नवीन समस्या निर्माण होतात. भौतिक शास्त्राच्या माध्यमातून गवसलेल्या सत्याची उंची जाणवू लागते त्यातून नवनवीन सत्य निर्माण होत राहतात. मात्र चिरंतन सत्य ते हे नव्हे याची मानवाला जाणीव होऊ लागते व यातूनच पुढे Subjective अथवा आत्मनिष्ठ युगाचा पाया घातला जातो.

**Subjective Age : आत्मशोधाचे युग –**

सबजेक्टिव्ह युगाची गरज आणि सुरुवात कशी निर्माण होते ते विशद करताना श्री अरविंद म्हणतात परंपरावादातील असत्य हे त्या परंपरा ज्यातून निर्माण झाल्या त्या सत्याला झाकोळून टाकत असतात आणि त्यातूनच जीवनाचं सत्य जाणून घेण्याची गरज निर्माण होते. पण व्यक्तिप्रधानतेच्या बंडखोरीतून मानव त्या मूलभूत सत्यापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यासाठी अंतर्यामी खोलवर जाण्याची गरज असते. त्यातूनच सबजेक्टिव्ह एजची हळूहळू सुरुवात होते.

सर्वसाधारणपणे त्या मूलभूत संकल्पनांचा आहे. त्या स्वरूपात स्वीकार करणं हा सोपा मार्ग वाटतो. काही मूलतत्त्ववादी तसा प्रयत्नही करत असतात. श्री अरविंदांच्या मते मात्र हे काहीसे अवघड असते कारण प्रगतिशील अशा मानवतेला पुराणमतवादी कल्पनांचा स्वीकार पटत नाही. "It's need is to progress to a larger fulfilment in which, if the old idea is taken up, it must be transformed & exceeded"

जुन्या कल्पनांचा स्वीकार हा नव्या आविष्कारातच करता येतो आणि म्हणूनच मानवी समाजाच्या प्रगतीसाठी व्यक्तिवादाची, तर्कशुद्ध वैचारिकतेची गरज असते. मात्र या पद्धतीने पुढे जात असताना नव्या इमारती तयार होण्याच्या पूर्वी जुन्या इमारती संपूर्णपणे जमीनदोस्त कराव्या लागतात असे प्रतिपादन करताना श्री अरविंद म्हणतात – "A temporary reign of the critical reason largely destructive in its action is an imperative need for human progress".

श्री अरविंद म्हणतात की – भारतामध्ये बुद्धकाळापासून जीवनातील सत्याचा शोध घेण्याचे अनेक प्रयत्न झाले पण हे सर्व प्रयत्न एका अत्यंत व्यापक आणि परमतसहिष्णुतेच्या आध्यात्मिक विचारसरणीतून झाले. त्यामुळे अनेक आंतरिक आणि बाह्य बदल झाले असले तरी परंपरावादाचा प्रभाव कायम राहिला.

आणखी एक कारणही संभवते. मुळात या प्रयत्नांचा हेतू काय होता? मानवाला त्याचा जीवनात सतत करावा लागणारा संघर्ष, त्यातून निर्माण होणारी दुःखं या साऱ्यांचं निवारण करणं हा हेतू होता. यामुळे दुःख निवारणाचं मार्गदर्शन झालं. पण त्या साऱ्यांचा उगम ज्यातून झाला त्या सत्याचा शोध मात्र मंदावला. समाजाला एक नवा 'समाधानाचा' मार्ग सापडला. पण समाजाचं व्यक्तिवादाच्या बंडखोरीत परिवर्तन झालं नाही. परिणामी भारताचा संपूर्ण मध्ययुगीन काळ परंपराप्रधान युगाच्या अंधकारातच राहिला. १९ व्या शतकात काही आशेचे किरण दिसले. मात्र तेही श्री अरविंदांनी म्हटल्याप्रमाणे पश्चिमात्य ज्ञानाच्या संपर्कातून निर्माण झाले होते. त्यांचा काही प्रमाणात फायदा झाला तरी काही धोके निर्माण झाले. शिवाय त्यांचंही उद्दिष्ट मर्यादित होतं. समाजातील विषमता नाहीशी करणं, विषमतेचे घटके बसलेल्या वर्गाला सक्षम

बनवून समतेची स्थापना करणं. या मार्गाने समाजाची हळूहळू प्रगती सुरू झाली. मात्र मूलभूत सत्याच्या शोधाची प्रेरणा मंदावली आणि समाज परंपराप्रधान युगाच्या प्रभावातच कायम राहिला.

व्यक्तिवादाच्या प्रभावांतून माणूस आत्मशोधाकडे कसा वळतो ते स्पष्ट करताना श्री अरविंद म्हणतात की, व्यक्तिवादाचा उदय हा मानवी जीवनाचा कायदा आणि त्यांतील सत्य शोधण्याच्या प्रवृत्तीमधून आलेला असतो. त्याचा प्राथमिक हल्ला धर्म आणि धर्मातील अनिष्ट रूढी व परंपरा यांच्यावर होतो. मात्र त्यानंतर बंडखोरीचे हे विचार साहित्य, संगीत, कला, समाजकारण, राजकारण इत्यादी जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापून टाकतात. मात्र याच प्रयत्नात मानवाला हळूहळू उमगू लागतं की त्याचं अस्तित्व स्वतंत्र नाही. तो या वैश्विक पसाऱ्याचा एक छोटासा भाग आहे आणि त्यामुळे त्याच्या जीवनाचा कायदा आणि त्यांतील सत्य समजण्यासाठी तो ज्याच्याशी जोडलेला आहे. त्या विश्वाचा कायदा आणि त्यातील सत्य समजणं अनिवार्य ठरतं आणि याच प्रक्रियेतून Subjective Age चा पाया घातला जातो.

या शोधाची प्राथमिक सुरुवात ही अर्थातच मानव आपल्या बौद्धिक विचारशक्तीच्या माध्यमातून करू लागतो. पण लवकरच त्याला समजतं की आत्म्याचा शोध घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. हा शोध सुरू झाला की, मानवाला आपल्यात असणाऱ्या अनेक सुप्त शक्तींचं ज्ञान प्राप्त होतं. श्री अरविंद म्हणतात, " In this provess the rationalistic ideal begins to subject itself to the ideal of intuitional knowledge and a deeper selfawareness; the utilitarian standard gives way to the aspiration towards self-conciousness and self-realisation."

या सर्व गोष्टी जरी अत्यंत प्राथमिक अवस्थेमध्ये असल्या तरी त्या कोणत्या ना कोणत्या तरी हळूहळू प्रगट होत आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नित्शेच्या या तत्वाला अनुसरून आसुरी वृत्तीचा प्रभाव निर्माण झाला. सारं जग दोन महायुद्धांनी होरपळून काढलं. पण त्यानंतर मात्र तो प्रभाव कमी झालेला दिसतो. सार्वत्रिक शांततेत सर्वांच हित आहे हे मान्य होऊ लागलं. गेल्या काही वर्षांत साहित्य, संगीत आणि कला या क्षेत्रांतील निर्मिती मनोवैज्ञानिक भूमिकांच्या पायावर होऊ लागली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातही आश्चर्यकारक असे बदल घडवावं हा विचार रुजू लागला आहे. भौतिक शास्त्राच्या ज्ञानांतून केवळ स्वतःच्या सुखसोयींचा विचार करणाऱ्या मानवाला आता पर्यावरण राखण्याची गरज पटू लागली आहे.

श्री अरविंद म्हणतात की याच वाटचालीतून मानवाला उमजेल की, " Man is inwardly a sould and a concious power of the Divine." बाह्यात्कारी दिसणाऱ्या या मानवाच्या अंतर्यामी असणाऱ्या 'खऱ्या' मानवाला बाहेर आणणं हेच मानवी जीवनाचं उद्दिष्ट अरहे. असं सांगून श्री अरविंद म्हणतात, "That was the knowledge which the ancients sought to express through religious and social symbolism and subjectivism is a road of return to that lost knowledge."

मानवाची मानसिकता आणि बौद्धिक विचारशक्ती या दोन गोष्टींना केन्द्रस्थानी ठेवून मानवी समाजाच्या वाटचालीचे आणि प्रगतीचे टप्पे आपण पाहिले. आता यापुढील भागात मानव आणि मानवी समाज यांचा परस्पर संबंध, त्यांची प्रगती, त्या प्रगतीची दिशा, त्यातील अडथळे इत्यादी बाबींवर श्री अरविंदांनी व्यक्त केलेले विचार जाणून घेऊ.

आधार : महायोगी श्री अरविंद यांचा Human Cycle हा ग्रंथ.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

# ।। श्री रामचरित मानस ।।

(मागील अंकावरुन पुढे)

*रामचरित मानससंदर्भातील लेख मालेतील हा पुढील लेख - संपादक*

सज्जन माणसाच्या घरांतील पक्षी रामाचे स्मरण करतात तर वाईट माणसाच्या घरातील पक्षी शिव्याच देत असतात. कुसंगामुळे धूर काजळी म्हणवला जातो. तोच धूर सुसंगामुळे शाईत रुपांतरित होऊन पुराण लिहण्यास उपयोगी होतो; तोच धूर जल, अग्नि आणि वाऱ्याच्या संगतीने ढगांत रुपांतरित होऊन जगाला जीवन देणारा बनतो. ग्रह, औषध, पाणी आणि हवा या सर्व वस्तू चांगल्या अथवा वाईट संगतीने मिळून चांगले अथवा वाईट बनतात. हे सर्व चतुर आणि विचारवंत लोकच जाणतात. महिन्याच्या दोन्ही पंधरवाड्यांत उजेड आणि अंधार सारखाच असतो पण त्यांच्या नावांमुळे त्यांच्यात विधात्याने भेद केला आहे. एक चंद्रमाला वाढविणारा तर दुसरा चंद्रमाला घटविणारा शुक्ल पक्ष अथवा कृष्ण पक्ष असे यश अथवा अपयश जगताने दिले आहे.

जड चैतन्य अशा जगांतील सर्व जीवांना राममय जाणून त्यांचे पदकमल सदा दोन्ही हात जोडून मी वंदन करतो. दैव, दैत्य, मनुष्य, नाग, प्रेत, पितर, गंधर्व, किन्नर, राक्षस ह्या सर्वांनी माझ्यावर कृपा करावी. चौऱ्यांशी लक्ष योनीतील सर्व प्राणी मात्रांना दोन्ही हातांनी वंदन करुन श्री. तुलसीदासजी स्वतःवर त्यांनी कृपा करावी अशी मी विनंती करतो. कारण श्री रघुनाथांच्या गुणांचे वर्णन करण्याचे अवघड काम तुलसीदासजींना करायचे आहे. रामचरित्र आणि आपली अल्प बुद्धी ह्याचा मेळ त्यांना मिळविता येत नाही असे तुलसीदास म्हणतात. अमृत पिण्याची ईच्छा तर आहे पण ताक मिळण्याची सुद्धा लायकी नाही. त्यामुळे स्वतःच्या बालबुद्धीने जे गुणगान ते करणार आहे त्याला सर्व लोकांनी प्रेमपूर्वक व मनापासून ऐकावे ही त्यांची विनंती आहे. आपल्या छोट्या मुलाचे बोबडे बोल त्याचे आईवडील किती कौतुकाने ऐकतात. परंतु दुसऱ्याच्या दोषांना स्वतःचे भूषण समजणारे लोक त्या छोट्या बालकाच्या बोलण्याचे कुटीलपणे ''हास्य'' करतात अर्थात स्वतःचे काव्य चांगले असो अथवा वाईट प्रत्येक कवीला ते चांगलेच वाटते. पण दुसऱ्याचे काव्य वाचून आनंद वाटणारे लोक जगात फारच कमी आहेत. येथे त्यांनी एक उत्तम उपमा दिली आहे ती चौपाई अशी आहे.

जग बहु नर सर सरि सम भाई। जे नीज बाढि बढ़ही जल पाई।।
सज्जन सकृत सिंध सम कोई। देखि पूर बिधु बाढइ जोई।।

जगांत तलाव आणि नद्यांप्रमाणे स्वतःच्या पाण्यांत वाढ होताच उत्साहित होणारे पुरुष बरेच आहे. पण वाढणाऱ्या चंद्राकडे बघून उधाण येणाऱ्या समुद्रासारख्या व्यक्ती थोड्याच असतात. माझे छोटे भाग्य असले तरी मोठी इच्छा आहे. तरी हे रामचरित्र सज्जन लोकांना वाचून आनंद होईल आणि दुष्ट लोक ह्याचा उपहास करतील. पुढच्या चार चौपाई आणि दोह्यांत राम भक्तांना हे रामयण का आवडते ह्याचे कारण दिले आहे. शेवटी ते लिहतात की, ''माझ्या काव्यांत खूप दोष असले तरी एक फारच मोठा गुण आहे. तो म्हणजे रामाचे नाव आहे. त्यामुळे निर्मल मन असणारे बुद्धिवादी लोक हे काव्य जरुर ऐकतील.''

एहि महँरघुपति नाम उदारा। अति पावन पुरान श्रुतिसारा।।
मंगल भवन अमंगल हारी। उमा सहित जेहि जपत पुरारी।।

छोट्या गोष्टींवरही श्रद्धा ठेवा. त्यातूनच तुमचे सामर्थ्य वाढत असते. - मदर तेरेसा

या कथेत श्री रघुनाथजींचे अत्यंत पवित्र, वेद पुराणांचे सार, कल्याणाचे धाम, अमंगलाचा नाश करणारे ज्याचे श्री. पार्वतीमातेसह भगवान शिवजींचा सदा जप करतात. ते उदार नाव आहे. त्यानंतरच्या ग्रंथाच चौपाई आणि दोह्यांत रामनामाचे महत्त्व आणि या रामचरित्र मानसांत स्नान केल्याने होणाऱ्या अकथनीय लाभांचे सविस्तर कथन आले आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्या स्वतःच्या बुद्धीची कीव करत ह्या काव्याची महती त्यांनी वर्णन केली आहे ते म्हणतात.

कवि न होऊँनहि चतुर कहावऊँ। मति अनुरुप राम गुन गावऊ।।
कहँ रघुपति के चरित अपारा। कहँ मति मोरि निरत संसारा।।

ज्या काव्याला प्रत्यक्ष श्री शंकर भगवानांकडून "सत्यं शिवम् सुंदरम" असा अभिप्राय मिळाल्याचे सांगितले जाते ते श्री. तुलसीमहाराज स्वतःला कवी चतुर वगैरे म्हणवून न घेता संसारात आसक्त असणारा पुरुष म्हणवून घेतात, त्यांचे मोठेपण ते काय लिहावे? लिहू तेवढे थोडेच आहे. श्री. रघुनाथजींचे चरित्र अपार आहे. त्याचे वर्णन शारदा, शेष, शिवजी, वेद, पुराण सुद्धा "नेति नेति" ( पार पाउन सुद्धा असे नाही असे नाही) असं वर्णन करतात तेथे स्वतःला श्री. रघुनाथजींचे वर्णन करतांना फारच संकोच वाटत आहे असं ते लिहतात. पण मग आपण श्री. रघुनाथजींच्या लीलांचे वर्णन करायचंच का असा प्रश्न त्यांना पडतो. पण त्याला नाम नाही. रूप नाही जे आजन्म सच्चिदानंद परमधाम विश्वरूप स्वतःच्या भक्तांच्या हितासाठी नरदेह धारण करून गरीब अनाथ अशा भक्तांचे रक्षण करतात. त्यांच्या लीलांचे वर्णन स्वतःची वाणी पवित्र करण्यासाठी त्यांच्या पायांचे स्मरण करणार आहे. वाल्मिकी व्यास आदि ऋषीमुनींनी अगोदरच "हरी" ची कीर्ती वर्णन करून ठेवलीच आहे. त्यामुळे त्याच मार्गावरुन जाणे मला अगदीच सोपे होणार आहे. उपमा बघा किती सुंदर दिली आहे.

अति अपार जे सरित बर जौनृप सेतु कराहिं।
चढि पिपिलिकउ परम लघु बिनु श्रम पारहि जाहिं।।

मोठ्या मोठ्या श्रेष्ठ नद्यांवर राजाने पूल बांधून ठेवला तर छोट्या छोट्या मुंग्याही त्या नद्या सहज पार करुन जाऊ शकतात. त्याचप्रमाणे श्रेष्ठ मुनींच्या वर्णन केलेल्या राम लीलांवरुन मी स्वतः श्री. रामचरित्र वर्णन सहज करू शकतो.

याप्रमाणे स्वतःच्या शक्तीची असमर्थता दाखवत श्री. रघुनाथजींच्या रामकथेची सुरुवात करतात. व्यास वाल्मिकी यांच्या चरणांना वंदन करून माझे मनोरथ पूर्ण करण्याची विनंती करीत आहे. संत संगतीचा महिमा श्री. तुलसीदास महाराजांनी उत्तरकांडात खूप उत्तम तऱ्हेने वर्णन केला आहे. तसं तर श्री. रामचरित मानस ह्या पूर्ण ग्रंथात राम भक्ती आणि संतसंग ह्याला खूपच महत्त्व दिले गेलं आहे.

अयोध्याकांडात रामरायांचे परमभक्त भरतजी काय मागतात?

अरथ न धरम न काम रूचि। गति न चहहुँ निरबान।।
जनम जनम रति राम पद। यह बरदानु न आन।।

अर्थ, धर्म, काम आणि निवार्ण पद, म्हणजे मोक्षापेक्षाही जन्म जन्म रामाच्या पदाची ते भीक मागतात. त्याच्या अगोदरची चौपाई इतकी सुंदर आहे,

मागऊँ भीख त्यागि निज धरमू।
आरत काह न करवू कुकरमू।।

स्वतःचा धर्म भीक न मागण्याचा क्षत्रियधर्माचा त्याग करून मी भीक मागत आहे. कारण आर्त किंवा अति दुःखी मनुष्य कोणतेही कुकर्म करू शकतो आणि भीकही मागतात तो काय की मला राम पदाची रूची द्यावी. उत्तरकांडात श्री भरतजी रामरायांना विचारतात की तुमच्या तोंडून संतांचा महिमा जाणून घ्यायचा आहे. ज्यांच्यावर तुमचा स्नेह आहे.

---

त्यांचे गुण आम्हांला सांगा. तसेच, तुम्ही गुण आणि ज्ञानांत निपुण आहात जेव्हा संत आणि असंत यांच्यातील भेद सांगा. त्यावर रामरायांचे उत्तर फारच सुंदर वर्णन केले आहे.

संत असंतन्हि कै असि करनी। जिमि कुठार चंदन आचरनी ।।
काटइ परसु मलय सुनु भाई। निज गुन देह सुगंध बसाई ।।

संत आणि असंत यांची करणी चंदनाचे झाड आणि त्याला कापणारी कुऱ्हाड यांच्या सारखी आहे. कुऱ्हाड चंदनाचे झाड तोडते. कारण तो तिचा स्वभाव अथवा धर्म आहे आणि चंदन आपल्या स्वभावानुसार आपला गुण देऊन कुऱ्हाडीला सुगंधित करून टाकतो. कारण सुगंध देणं हा चंदनाचा मुळी धर्मच आहे. पण दोघांचे गुण वेगळे असल्यामुळे त्यांचे फळही वेगवेगळे मिळते. चंदन त्याच्या गुणामुळे देवतांच्या कपाळावर विराजमान होत तर कुऱ्हाडीला आगीत तापऊन तिच्या तोंडावर घणाचे घाव घातले जातात.

ताते सर सीसन चढत। जग एललम श्रीखंड ।।
अन दहि पीटत धनही। परसु वदन यह दंड ।।

संतांचे बरेच गुण आणि असंतांचे अवगुण श्री मुखातून वर्णन केले आहेत. ते आपण उत्तरकांडात सविस्तर बघणारच आहोत. उत्तरकांडात शेवटच्या टप्प्यात श्री काकभुषुंडीजी आणि श्री गरुडजी हयांच्यातील संवाद फारच सुंदर आहे.

श्री रामचरीतमानसची पूर्ण कथा श्री काकभुषुंडींना श्री गरुडजींना सांगितली आहे. ती पूर्ण ऐकून झाल्यावर श्री गरुडजी श्री काकभुषुंडींना सांगतात

मै कृतकृत्य भयऊँ तव बानी।
सुनी रघुबीर भगति रसासानी।
राम चरन नूतन रती भई।
माया जनित बिपती सब गई।
मोह जलधि बोहित तुम्ह भए।
मो कहँ नाथ बिबिध सुख दहा।
मो पहि होइ न प्रति उपकारा।
बंदऊँ तव पद बारहि बारा ।।
पूरन काम राम अनुरागी।
तुम्ह समान न कोऊ बडभागी ।।
संत बिटप सरिता गिरी धरनी।
पर हित हेतु सबन्ह कै करनी ।।
संत हृदय नवनीत समाना।
कहा कबिन्ह परि कहै न जाना ।।
निज परिताप द्रवइ नवनीता।
पर दुख द्रवहि संत सुपुनीता ।।
जीवन जन्म सुफल मम भयऊ।
तव प्रसाद संसय सब गयऊ ।।
जानेहु सदा मोहि निज किंकर।
पुनि पुनि उमा कह बिहंगबर ।।

**दो:- तासु चरन सिरु नाइ करि प्रेम सहित मतिधीर।**
**गयउ गरुड बैकुंठ तब हदयँ राखि रघुबीर ।।**
**गिरिजा संत समागम सम न लाभ कछुआन।**
**बिनु हरि कृपा न होइ सो गावहि बेद पुरान ।।**

श्री तुकाराम महाराज सुद्धा हेच मागतात,
नलगे मुक्ती धन संपदा संत संग देई
श्री ब्रह्मचैतन्य महाराजांनी हेच रामरायांना मागितलं आहे.

मी न मागे धनसंपत्ति। मज न लागे वैकुंठप्राप्ति ।।
परी तुझ्या भक्तांची संगती। मज घडो सर्वदा ।।
कोट्यांनिकोटि जन्म घेईन। करीन तुझे पादसेवन ।।
अवतरलीला मुखाने गाईन। ऐसे मज देई सर्वथा ।।

थोडक्यात सगळ्या संतांना सत्संगती मोक्षापेक्षाही जास्त महत्वाची आणि जवळची वाटते. तुलसीदासांनी संतांना लोण्यापेक्षाही मऊ अथवा मृदू म्हटले आहे. कारण लोण्याला स्वतःला आगीची आच लागताच ते वितळू लागते. पण संत दुसऱ्याचा ताप बघून स्वतःच वितळू

लागतात. उरलेल्या चौपाईंचा अर्थ समजण्यासारखं असल्यामुळे त्यावर जास्त लिहावं असं वाटत नाही. पण शेवटचा दोहा फारच सुंदर आहे. शंकर भगवान सांगतात, हे उमा सत्‌संगासारखा दुसरा कुठलाच लाभ नाही. पण वेद पुराणे हेच सांगतात की, परमेश्वर कृपेवाचून संतसमागम अर्थात संतांची भेट होऊ शकत नाही. मला श्री. तुलसीदासांचा एक सुंदर दोहा लिहिण्याचा मोह होत आहे. तो दोहा असा आहे, ''तुलसी इस संसारमे पांच रतन है सार संत मिलन हरी और भजन, दया, धर्म, उपकार, हरी भजन, संतांची भेट हीच जगातली पांच खरी रत्ने आहेत. एका कीर्तनात मी हिन्दी कीर्तनकारांकडून उत्तम काव्य ऐकलं.

भजन करलु करले नरहरका

मजा फिरे आये नरतनक

नरतन ह्या शब्दाची फोड तीन तऱ्हेने केली जाऊ शकते. नर तन का मनुष्याच्या शरीराचा, नरतनका न रतनका म्हणजे रत्नाची सुद्धा मजा घेऊ शकत नाही. म्हणजे रत्नापेक्षा ते जास्त सुखदाई होऊ शकते. नरतन का 'नरतन' म्हणजे नाच करण्याची मौज सुद्धा आपण अनुभवू शकतो.

थोडक्यात, सत्‌संगती भक्ती भजन ह्या सर्व गोष्टी अपार सुखकारक आहे आणि त्यांचे मोजमाप होऊच शकत नाही. अरण्यकांडाच्या शेवटच्या भागात श्री शंकरभगवानांनी सगळ्या रामायणांच सार सांगितलं आहे. म्हणजे मला ते रामायणाचं सार वाटत.

**उमा कहेऊ मैं अनुभव अपना सत हरी भजन जगत सब सपना**

ह्यापेक्षा जास्त काय असू शकतं.

हरी भजन हेच फक्त सत्य आहे. बाकी सर्व स्वप्नवत आहे. पण हे सत्य कळायला आपल्याला पूर्ण आयुष्य लागतं. ह्या ऋषीमुनींनंतर ज्या ज्या प्राकृत अथवा इतर भाषांमधील रामचरित्रांचे वर्णन करणाऱ्या सर्वच कविता वंदन करून आपली रामगाथा उत्तम होण्यास आर्शिवाद मागतात. वाल्मिकी ऋषी जे रामायणाचे मूळ लेखक आहेत आणि ज्यांचे रामायण खर राक्षसासहीत असून सुद्धा कोमल आहे व दूषण सारख्या राक्षससहीत असून सुद्धा दूषीत नाही. त्यांना प्रणाम करतात. इथला दोहा फारच सुंदर आहे.

**सो:- बंदऊ मुनि पद कंजु रामायण जेहि निरमयउ।**
**सखर सुकोमल मंजु दोषारहित दूषासहीत ।।**

त्यानंतरच्या बऱ्याच चौपाई व दोह्यांमध्ये ब्रम्हाजी गंगाजी शारदा ब्राम्हण पंडीत ग्रह शंकरजी पार्वती माता ह्यांची वंदना केली आहे. नंतर अवधपूरी म्हणजे अयोध्यानगरी शरयु नदी, रामरायांचे माता पिता श्री कौसल्या माता श्री दशरथराजा, रामाचे परमभक्त श्री भरतजी, श्री लक्ष्मणजी, श्री शत्रुघ्नजी यांचे वंदन केले आहे. ज्यांचे यशाचे वर्णन स्वतः श्री रामजी करतात त्या महावीर हनुमानजींचे वंदन केले आहे. ते लिहतात.

**सो:- प्रनऊ पवनकुमार खल बन पावक ग्यान घन।**
**जासु हृदय आगार बसहि राम सर चाप धर ।।**

दुष्टरुप वनाचे भस्म करणाऱ्या अग्निसमान आणि ज्ञानाचे स्वरूप आणि ज्यांच्या हृदयरुपी भवनांत धनुष्य बाण धारण करणारे श्री रामजी निवास करतात त्या श्री हनुमानजींना वंदन केले आहे. नंतर कपिपती सुग्रीव, रीछपति श्री. जांबुवंतजी, राक्षसांचे राजे श्री. बिभीषणजी आणि अंगदजी आणि त्या सगळ्यांचा वानर आणि भालु समाजाला वंदन केले आहे; कारण अधम शरीर मिळून सुद्धा ज्यांनी श्री. रामचंद्रजींना प्राप्त करुन घेतलं. श्री. शुक्रदेव, नारद मुनी, निष्कामपणे श्री राम उपासना करणारे पशु पक्षी देवता ऋषीमुनी यांना वंदन केले आहे.

करुणानिधान श्री रामजींची प्रियतमा राजा जनकाची पुत्री, जगताची माता श्री जानकीजींच्या चरणकमलांची वंदना केली आहे. सगळ्यांत शेवटी कमळासारखे नयन असणाऱ्या आणि आपल्या भक्तांच्या विपत्तीचा नाश करणाऱ्या त्यांना सुख देणाऱ्या भगवान श्री रामचंद्रजींच्या

---

ईश्वर आपल्याला एका वेळी एकच क्षण देतो व दुसरा देण्याच्या वेळी पहिला परत घेतो. - यदुनाथ थत्ते

चरणकमलांची स्वतःच्या मन, वचन, कर्माने वंदना झाली आहे.

**गिरा अरथ जल बीचि सम। कहिअत भिन्न न भिन्न ।।**
**बंदऊँ सीता राम पद। जिन्हहि परम प्रिय खिन्न ।।**

वाणी आणि अर्थ, जल आणि जललहरी प्रमाणे सारखे भासणारे पण वास्तविक एकस्वरूप श्री सीतारामजी यांची चरणांची वंदना केली आहे कारण त्यांना दुःखी लोक फारच प्रिय वाटतात.

पुढील दो.क्रं १८ ते दो.क्रं २९ आणि त्यामधील सगळ्या चौपाईत रामनामाचा महिमा वर्णन केला आहे. नाम आणि नामी ह्यापैकी कोण मोठं आणि कोण लहान हे सांगणे फारच कठीण आहे. रूप आणि नाम हे एकमेकांशी जोडले असले तरीही नामाशिवाय रूपाच ध्यान होऊ शकत नाही. जसं बारीक मीठ आणि बारीक पिठी साखर सारखेच दिसतात. त्यांना त्यांच नाव न सांगता हातावर ठेवले तर ओळखणं फारच अवघड आहे. पण त्यांच नांव सांगताच त्यांचे ज्ञान कळू शकते. त्यामुळे रूपासकट नाम घेणंच श्रेयस्कर आहे. नंतर निर्गुण आणि सगुण रूपाचं विवेचन केले गेले आहे. निर्गुण व सगुण ही देवाचीच दोन ब्रम्हाची स्वरूप आहेत. पण त्या दोघांपेक्षाही नाम मोठे आहे. पुढे असेच नामाचे महत्व देत शेवटी निर्गुण व सगुणापेक्षा नाम मोठे वाटत असल्यामुळेच रामाच्या शतकोटी चरित्रांतून राम हे सार श्री शंकरभगवानांनी निवडले आहे. दोहा क्रं.२५ ते २९ मध्ये परत नाम हे किती महत्त्वाचे आणि किती महान आहे हयाचे विवेचन केले आहे.

प्राचार्य सी. श्री. मुजुमदार
१०४, फ्लॅट सी-२, इमारत क्रं-३
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई - ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

## नागरिकांची दहा कर्तव्ये

(१) संविधानाचे पालन केले पाहिजे आणि त्यातील आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

(२) स्वातंत्र्यासाठी आपल्या राष्ट्रीय आंदोलनास प्रेरणा देणारे उच्च आदर्श मनोमन जपणे व त्यांचे पालन करणे.

(३) भारताचे सार्वभौमत्व, एकता व अखंडता यांचे रक्षण करणे आणि ते अबाधित राखणे.

(४) देशाचे संरक्षण करणे व आपत्कालीन परिस्थितीत राष्ट्रीय सेवा करण्यास तत्पर असणे.

(५) भारताच्या सर्व लोकांमध्ये समरसता व समान बंधुभावाची भावना निर्माण करणे. ही भावना धर्म, भाषा, प्रादेशिकता किंवा विभागीय वैविध्यांच्या भेदभावापेक्षा श्रेष्ठ असेल, तसेच महिलांच्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध असेल अशा प्रथांचा त्याग करणे.

(६) आपल्या सामाजिक संस्कृतीच्या गौरवशाली परंपरेचे महत्व जाणून तिचे रक्षण करणे.

(७) वने, जलप्रवाह, नद्या व वन्यजीव या सर्वांनी बनलेल्या प्राकृतिक पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे. तसेच प्राणिमात्रांबद्दल अनुकंपा धारण करणे.

(८) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद तसेच जिज्ञासा व सुधारक वृत्तीचा विकास करणे.

(९) सार्वजनिक संपत्ती सुरक्षित राखून हिंसेपासून परावृत्त होणे.

(१०) राष्ट्राला निरंतर सफलतेची उत्तुंग शिखरे गाठता यावीत, म्हणून वैयक्तिक सर्व क्षेत्रांतील व सामूहिक उपक्रमांमध्ये उत्कृष्टतेप्रत वाटचाल करणे.

- संग्रहातून

# स्वामी विवेकानंद

(लेखांक २)

*सजीव, निर्जीव यांतील भेद, उपनिषद पूर्वकाळातील संकल्पना व तत्संबंधीचे विचार या लेखात आहे.*

**भक्तियोग - भक्तीचे लक्षण**

भक्तियोग म्हणजे खऱ्या अकृत्रिम भावाने भगवंताचे अनुसंधान. ह्याची उत्पत्ती प्रेमातून. प्रेमानेच त्याचा परिपोष आणि त्याची परिसमाप्ती ही प्रेमातच, अत्युत्कट भगवत् प्रेमाचा क्षणभराचा दिव्य उन्मादही आपल्याला मुक्त करू शकतो. नारद म्हणतात - भक्ती म्हणजे भगवंताविषयी गाढ प्रेम. या दिव्य प्रेमाच्या मदतीने पार्थिव भोग्य वस्तूंचा लाभ करून घेता येणे शक्य नाही. कारण वासना असेपर्यंत हे असले अपार्थिव प्रेम उपजणेच अशक्य होय. भक्ती ही कर्म, ज्ञान आणि योग या तीन्हीपेक्षा श्रेष्ठ आहे. या तीन्हींना एखादे फल प्राप्त करुन घ्यावयाचे असते. भक्ती स्वतःच फलस्वरूप आहे. भक्तीचे साधन व साध्य भक्तीच.

भक्तीचा एक मोठा गुण हा की आपल्या जीवनाचे परम लक्ष जो ईश्वर त्याच्या प्राप्तीचा तो अगदी सरळ सोपा नि अत्यंत स्वाभाविक मार्ग होय. सर्वच धर्मातील अविकसित बुध्दीच्या व्यक्तींना स्वतःच्या आदर्शावर प्रेम करण्याचा एकच धोपट मार्ग ठाऊक असतो, तो म्हणजे आपल्या खेरीज इतर आदर्शांची घृणा करणे.

**हा धोका गौणी भक्तीत -**

हा भक्तीचा अपरिपक्व अवस्थेतच फक्त संभवतो. भक्ती परिपक्व होऊन पराभक्तीत परिणत झाल्यावर तीत पक्षांधतेला कधीच थारा मिळत नाही.

ज्या चारित्र्यामध्ये ज्ञान भक्ती आणि योग या तिहींचा मधुर मिलाफ होऊन सुसंवाद निर्माण झाला आहे, तेच चारित्र सर्वात उदात्त होय. उडता येण्यासाठी पक्षाला तीन गोष्टींची आवश्यकता असते. म्हणजे दोन पंख एक पुच्छ. ज्ञान हे पंखासारखे भक्ती दुसरा पंख व योग हो तोल सांभाळणारा पुच्छ.

**भक्तप्रल्हाद -**

या प्रीतिः अविवेकांना विषयेषु अनपायिनी।
त्वां अनुस्मरतः सामेहृदयात् मा अपसर्पतु।

ईश्वर सगुण आणि निर्गुण दोन्ही आहे. भक्त ज्याची उपासना करण्यात रममाण असतात जो सगुण ईश्वर तो ध्यानगम्य ईश्वराहून मुळीच निराळा नाही. आहे केवळ अद्वितीय ब्रह्मच. ब्रह्माचे निर्गुण रूप अतिशय सूक्ष्म असल्याने ते प्रेमाचा वा उपासनेचा विषय होऊ शकत नाही. म्हणून भक्तगण परब्रह्माचा सगुण स्वरूप म्हणजेच व्यक्त ब्रह्माची उपासना करण्यात आनंद मानतात. हे सगुण रूप म्हणजेच सर्व नियामक ईश्वर.

भक्तियोग दोन भागात विभागला गेला आहे. पहिला भाग गौणी अथवा साधनात्मिका भक्ती आणि दुसरा भाग म्हणजे परा किंवा परिपक्व भक्ती, परा ही गौणीची परिपक्व अवस्था होय. हा भक्ति मार्ग आक्रमिताना प्राथमिक अवस्थेत कित्येक बाह्य गोष्टींचे साहाय्य अगदी अपरिहार्य आहे. मूर्त साहाय्याखेरीज आपली प्रगती होणे असंभाव्य होय.

**गुरुची आवश्यकता**

प्रत्येक जीव पूर्णत्व प्राप्त करुन घेणार आहे. अंती सर्वांनाच सिध्दावस्था लाभणार आहे. आपण आज जे आहोत ते आपल्याच गत कर्मांचे नि विचारांचे फल होय.

ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे आणि कलेशिवाय जीवन नीरस आहे.

आणि आता करीत असलेल्या कर्मानुसार नि विचारानुसारच आपण भविष्यकाळी काय व्हावयाचे ते होणार आहोत. खुप बौध्दिक उन्नती झाल्याने तितक्याच प्रमाणात आपली आध्यात्मिक उन्नतीही होईल असे मुळीच नाही. अंतरात्म्याच्या जागृतीसाठी दुसऱ्या एका आत्म्यापासूनच शक्ती यावयास हवी.

ज्या व्यक्तीच्या आत्म्यापासून इतरांच्या आत्म्यात शक्ती संचारित होत असते त्या शक्तीला गुरू किंवा आचार्य म्हणत असतात. आणि ज्या व्यक्तीच्या आत्म्यात ती संचारित होते तिला शिष्य वा साधक म्हणतात. आत्म्याची धर्मपिपासा प्रबळ होताच धर्मशक्ती संचारक पुरुष त्या आत्म्याच्या साहाय्याशी धावून आलाच पाहिजे.

ज्या आचार्यांच्या हृदयात ज्ञान आणि सत्य ही सूर्यप्रकाशासारखी प्रकाशमान असतात. ते जगातील सर्व श्रेष्ठ महापुरुष होत. तेच जगद् गुरु होत. शिष्याच्या ठिकाणी आवश्यक असलेला. गुण म्हणजे पवित्रता, ज्ञानाची खरी तहान आणि चिकाटी हे होत.

शब्दजालं महारण्यं चित्तभ्रमणकारणम्।
वाक वैखरी शब्द झारी शास्त्र व्याख्यान कौशलम्।
वैदुष्यं विदुषांत द्वत् भुक्तये न तु मुक्तये।

नादमधुर शब्द योजना, चित्ताकर्षक वक्तृत्व, शास्त्र वाक्याचे तऱ्हेतऱ्हेचे अर्थ लावण्याची कुशलता इत्यादि सर्व प्रकार पंडितांच्या वादविवादाचे नि रसास्वादनाचेच विषय होत. या साऱ्यांच्या द्वारा अंतर्दृष्टीचा विकास होणे अशक्य.

**धर्म विचार : धर्माची आवश्यकता–**

ज्या ज्या शक्तींनी मानव जातीच्या भवितव्याला वेळोवेळी विशिष्ट घाट दिला आहे आणि आजही ज्या शक्ती मानवाचे भविष्य घडवीत आहेत. त्या साऱ्यात धर्म नावाची शक्ती सर्वात अधिक प्रबळ आहे. मानवी घटकांना एकत्र आणणारी त्यांना एकतेच्या सूत्रात ओवणारी आजपर्यंतची सर्वात मोठी प्रेरक शक्ती म्हणजे हा धर्मच होय.

धर्माच्या उत्पत्ती विषयी दोन मते विद्वानांना ग्राह्य वाटतात. धर्म हा मृतात्म्यांच्या पूजेतून उद्‌भवला आहे. धर्म हा मानवाच्या अनंतविषयक धारणेच्या विकासातून जन्मला आहे. मृत नातेवाईकांची शरिरे नष्ट झालेली असली तरी ते स्वतः अस्तित्वात आहेत असे मानून त्यांना अन्न अर्पण करु इच्छितो. असा धर्म यातून उद्‌भूत झाला असे काही लोक म्हणतात. इजिप्त बासिलोनिया, चीन, प्रभृती देशांच्या भागातील प्राचीन धर्मांची उत्पत्ती यातून झाल्याचा स्पष्ट खुणा आहेत. प्रचंड पिरॅमिड बांधून मृत शरीरांना इजा पोचू नये याची काळजी इजिप्तमधले लोक दक्षतेने वाहात असत. चीन मध्ये हा पूर्वज पूजेचा धर्मच जोरात फोफावत होता.

निसर्ग पूजेतून धर्माची उत्पत्ती प्राचीन आर्यांनी केली असे म्हणणारे लोकही आहेत. ऋग्वेदातही निसर्ग पूजाच आढळते. इंद्रियांच्या मर्यादा ओलांडून जाण्याचा प्रयत्न मानव आपल्या पितरांचे आत्मे धुंडाळीत असतो किंवा निसर्गाच्या विराट दृश्यांच्या मागे असलेल्या शक्तीचे स्वरुप तो समजावून घेऊ इच्छितो. या दोन्ही प्रकारात तो इंद्रियांच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न करीत असतो. अंतर्जगत् हेच त्याचे क्षेत्र होते. मनाच्या भिन्न भिन्न अवस्थांचा धांडोळा घेत माणूस सारखा अधिकाधिक खोलखोल जात गेला. आणि या अन्वेषणात जाग्रत वा स्वप्न या दोन्ही अवस्थांचा उल्लेख जगातील सर्वच सुसंघटित धर्मांनी केलेला आहे. तिला ते समाधि परमानंदाची अवस्था, अंतस्फूर्तीने लाभलेली अवस्था वगैरे नावे देतात.

सर्वच धर्म एक विधान करतात की मानवी मन कित्येक क्षणी केवळ इंद्रियांच्या नव्हे तर तर्काची शक्तीदेखील उल्लंघून जात असते. अशा वेळी त्याला सत्याचा साक्षात्कार होतो हीच सत्ये जगातील समस्त धर्मांचा पाया होत.

पदार्थ विज्ञान शास्त्राचे शोध मूर्त स्वरूपात धर्माने

प्रचारलेली सत्ये अमूर्त स्वरूपाची असतात. यालाच कोणी सर्व व्यापी पुरुष ईश्वर , नैतिक नियम अथवा सत् तत्व असे म्हणतात.

नीती सांगते आधी इतरांचे आणि मागाहून माझे. इंद्रिये म्हणतात आधी मी. याप्रमाणे नीतीचे नियम त्यागावर आधारलेले, भौतिक पातळीवर व्यक्तित्वाचा विनाश करणे संपूर्ण आत्मविलास हेच नीति शास्त्राचे ध्येय आहे.

उपयुक्तता नावाच्या सिध्दांताने माणसामाणसा मधील नैतिक संबंधांचा उलगडा होऊ शकत नाही. अतिंद्रिय प्रत्यक्षाखेरीज नीती असूच शकत नाही. अनंताकडे जाण्याच्या प्रयत्नाशिवाय आदर्श म्हणून काही असूच शकत नाही.

मी लोकांचे भलेच का करावे त्यांचे वाईट का करू नये? या प्रश्नांना उपयुक्ततावाद्यांचे काय उत्तर आहे? स्वतःचे सुख हेच जर मानवाचे लक्ष्य असेल तर मग मी इतरांना दुःखी करून स्वतःला सुखी करण्यास काय हरकत आहे? तसे करण्यापासून मला काय परावृत्त करु शकेल? इथे उपयुक्तता वाद अपुरा पडतो.

जोवर प्रकृतीच्यावर उठण्याची धडपड करीत आहे तोवर माणूस हा माणूसच असतो. प्रकृती द्विविध आहे. अंतःप्रकृती बहिःप्रकृती, आमच्या शरीरातील जड अणु परमाणूंना चालविण्याच्या नियमांचाच समावेश प्रकृतीत होतो. बाह्य प्रकृतीला जिंकणे ही फार चांगली आणि मोठी गोष्ट आहे. पण आपली अंतःप्रकृती जिंकणे ही त्याहीपेक्षा मोठी गोष्ट आहे. साऱ्यांना आणि ग्रहांना चालविणारे नियम जाणणे ही फार मोठी गोष्ट आहे. परंतु मानवाच्या मनोविकारांना त्यांच्या भावना त्यांच्या इच्छा शक्तीला चालविणारे नियम जाणून घेणे त्यापेक्षा अनंतपट श्रेष्ठ आणि चांगले आहे. मानवाच्या अंतःप्रवृतीला जिंकणे, मानवी मनात चालणाऱ्या सूक्ष्मक्रियांची रहस्ये जाणून घेणे मानवी मनातील अद्‌भुत गूढे जाणणे हे सारे संपूर्णपणे धर्माचे क्षेत्र आहे.

कोणत्याही जातीच्या शक्तीचा खरा उगम तिच्या आध्यात्मिकतेतच असतो आणि ज्या दिवसापासून त्या आध्यात्मिकतेस ओहोटी लागते आणि जडवादाचे वर्चस्व होऊ लागते, त्या दिवसापासूनच ती, जास्त मृत्युपंथास लागते. खालच्या पातळीवरील मानव इंद्रिय सुखात रममाण असतात तर सुसंस्कृत आणि सुशिक्षित माणसांना चिंतन, तत्वज्ञान, कला, विज्ञान इत्यादिकात आनंद लाभत असतो. अध्यात्म तर आणखी वरच्या पातळीवरील गोष्ट आहे. मानवी मनाला कार्य प्रवण करणारी धर्म ही सर्वात मोठी प्रेरक शक्ती आहे.

धर्माचे अध्ययन अनुशीलन आता पूर्वीपेक्षा विशाल दृष्टिकोणातून झाले पाहिजे. धर्म संबंधांच्या सर्व संकुचित मर्यादित कलह प्रसविणाऱ्या आक्रमक कल्पना आता लयास जावयास हव्यात. धर्मासंबंधीच्या साऱ्या पंथनिष्ठा, जमात निष्ठा, राष्ट्रनिष्ठा, या कल्पना टाकून द्यावयास हव्यात. प्रत्येक जाती जमातीच्या फक्त स्वतःचा असा एकेक विशिष्ट देव असावा आणि स्वतःतील इतर सगळ्यांचा देव खोटा आहे असे प्रत्येकाने मानीत रहावे ही भ्रामक वेडगळ समजूत आता भूतकाळात जमा व्हावयास हवी. असल्या सगळ्या कल्पनांचा सफशेल त्याग करावयास हवा.

धर्म आणि आधुनिक भौतिक विज्ञान यांच्यात मिलाफ घडून यावयास हवा जे ज्ञान देश काळ यांच्या शिवेतच कोंडून आहे. येत्या देशकाळातीत ज्ञानाशी जिभेवर मन इंद्रिये पोहोचू शकत नाहीत. त्या निरपेक्ष सत्य पूर्ण अनंत एकमेका द्वितीयांशी मिलन पाऊन त्यांच्याशी एकरूप होऊन जाईल. तेच मानवाचे सत्य स्वरूप.

**विश्वप्रेम आणि आत्मसमर्पण**

आधी समष्टीवर प्रेम करण्यास शिकल्या खेरीज व्यष्टीवर प्रेम करणे जमावयाचे नाही. ह्या विश्व

ब्रह्मांडामधील प्रत्येक वस्तू ईश्वराची उपाधी असून तो सर्वांतीत ईश्वर त्या सर्वांमध्ये आहे. समग्र विश्वाकडे अशा अखंड दृष्टीने बघितल्यास ती समष्टी म्हणजे ईश्वराचे रूपच आहे. पृथक पृथक रूपांनी आपल्या प्रत्ययास येणाऱ्या विश्वांतर्गत वस्तू म्हणजे व्यष्टी होत. समष्टी म्हणजे ईश्वर आणि व्यष्टी म्हणजे विश्वगत वस्तू. त्या समष्टीवर प्रेम केल्यासच समग्र व्यष्टीवर समस्त जगतावर प्रेम करता येणे शक्य आहे. समष्टी म्हणजे या मर्यादित गोष्टींना ऐक्याने व्यापणारे विराट रूप होय.

सर्व भूतांमधील अशा व्यापक साधारण तत्वाचे अनुसंधानच भारतीय तत्वज्ञानाचे व धर्माचे एकमेव कार्य आहे. एकमेव वैशिष्ट्य आहे. ज्याला जाणल्याने सारे जाणले जाते. त्या समष्टीरूप एकमेवा द्वितीय अनंत सर्वभूतामधील साधारण स्वरूप पुरुषाला जाणणेच ज्ञानियांचे ध्येय होय. भारतीय मन नेहमी बहुत्वामध्ये एकत्व शोधण्यातच गढलेले आढळून येते. हे मूलभूत सत्य आकळले जाते. तेव्हाच हृदयात विश्वप्रेमाचा उद्रेक होतो.

एवं सर्वेषु भूतेषु भक्तिः अव्यभिचारिणी।
कर्तव्यापंडितैः ज्ञात्वा सर्व भूतमयं हरिम्।

सर्व भूतांच्या रूपाने तो हरीच विराजत आहे. हे जाणून जाणत्या भक्ताने त्या सर्वांविषयी अव्यभिचारी भक्तीचा भाव बाळगावयास हवा. ह्या असल्या प्रगाढ सर्वंकष सर्व विस्तारक प्रेमाचेच फल म्हणजे संपूर्ण आत्म समर्पण.

**सजीव व निर्जीव**

क्षुद्र किडा अनंताचा एक लहान अंश आहे म्हणून शक्तिशाली इंजिनापेक्षा तो श्रेष्ठ आहे. यंत्राच्या क्रिया सजीवांच्या नसतात. सजीवात स्वाधीनता असते, चैतन्य असते. निर्जीवात सर्व काही परतंत्र पराधीन, स्वाधीनता बिलकूल नसते. कारण त्याच्या ठिकाणी चैतन्य नसते. ज्या स्वाधीनतेमुळे आपण निव्वळ यंत्रापासून निराळे आहोत त्या स्वाधीनतेसाठीच आपण सारे धडपडत आहोत. आपल्या सर्वांचे लक्ष अधिकाधिक स्वाधीन होणे हे आहे. कारण पूर्ण स्वाधीनतेतच पूर्णत्व असू शकते. स्वाधीन प्राप्तीची ही आकांक्षाच सर्व प्रकारच्या उपासनांच्या मुळाशी असते.

आनंद पूर्ण स्वाधीनतेपासून उद्भवलेली शाश्वत शांती व कशानेही परिछिन्न न झालेली पूर्ण अमर्याद सत्ता हेच धर्माचे सर्वश्रेष्ठ स्वरूप आहे. हाच वेदान्तातील ईश्वर विषयक सर्व कल्पनांचा आधार आहे. या सत्तेत प्रकृती किंवा कोणतीही वस्तू कधीही परिवर्तन घडवू शकत नाही. हीच स्वाधीनता तुमच्यात आणि माझ्यात आहे.

ईश्वर सदाच आपल्या दिव्य व अपरिवर्तनीय अशा सत्तेत अधिष्ठित आहे. तुम्ही आम्ही त्या ईश्वराशी एकरूप होऊ पाहातो. पण प्रकृतीच्या मागे दैनंदिन जीवनातील यःकश्चित् वस्तूंच्या मागे धन किर्ती मानवी प्रेम इत्यादी मागे सारखे धावत असतो.

विश्वाच्या मुळाशी एकत्व जर नसेल तर अनेकत्वाचेही ज्ञान आपल्याला होऊ शकणार नाही. विश्वाच्या सर्व स्पंदनांमध्ये स्वाधीनता स्पंदन आहे. एकत्व हाच सर्वात मोठा धर्म आहे. मी अमुक अमुक आहे हा झाला संकुचित विचार. हा विचार हा काही खरा आत्मभाव नव्हे. ईश्वर आत्मरूप आहे म्हणून आत्मरूपाने व सत्याच्या रूपाने त्याची आराधना करणे आवश्यक आहे. ईश्वर आत्मा आहे म्हणून अनंत आहे. तसेच माणूसही आत्मा असल्याने अनंत आहे आणि अनंतच अनंताची उपासना करु शकतो. आपण अनंताची उपसना करू या. हीच सर्वश्रेष्ठ आध्यात्मिकता.

**उपनिषदपूर्व काळी**

उपनिषदाच्या पूर्व काळात यज्ञयागादी कर्मकांड खूप प्रचारात होते. उपनिषत् काळी तत्वज्ञानाचा उदय झाला.

सुदैवाने आजकालच्या आमच्या सर्वज्ञ समाज सुधारकाप्रमाणे त्यांनी त्या जुन्या रूढ यज्ञयागादी कर्मा विरुध्द टोकेची झाडे उठविली नाही. आज कालच्या समस्त एक ज्ञान समाज सुधारकासारखी केवळ निषेधकाची विघातक, भंजक भूमिका त्यांनी घेतली नाही. हे सारे यज्ञ याग खोटे म्हणून उडवून देण्याचा त्यांनी सपाटा चालविला नाही. सामान्य अज्ञजन जी प्रतीके-प्रतिमा-कर्मे घेऊन आपले जीवन घालवीत होते ती त्यांच्या हातून हिसकावून घेतली नाहीत. तर त्या सत्यांचा खरा अर्थ, त्यांचे तात्पर्य त्यांना समजावून देऊन खरोखर मग कशाच्या आश्रयाने जीवन घालवावयास हवे हे त्यांना दाखवून दिले. त्यांची भूमिका रचनात्मक, विधायक होती. एक अनिष्ट वस्तू काढून घेताना दुसरी इष्ट वस्तू त्यांनी त्यांच्या हाती दिली. त्यांनी लोकांना सांगितले तुम्ही या अग्नीत हवन करता तो तुमचे प्रतीक होय. सर्वात श्रेष्ठ वेदी आहे मनुष्य देह, जिवंत सचेतन-त्याहून जड निर्जीव प्रतिमापेक्षा कितीतरी श्रेष्ठ उच्च आणि उदात्त नव्हे काय?

### 'तत्वमसि' याचा अर्थ

व्यावहारिक सत्ता म्हटले की तिथे गती आलीच. परंतु विश्वव्यापक पारमार्थिक सत्तेला गती लागू होत नाही. अणु सदा परिवर्तन पावतो व गतिमान आहे. परंतु समस्त ब्रह्मांडाचा एकदम विचार केला असता ते परिणाम पावते असे म्हणता यावयाचे नाही. कारण परिणाम वा गती ही नेहमी सापेक्ष असते. स्थिर वा गतिहीन पदार्थाच्या अपेक्षेने आपण एखादा पदार्थ गतिमान आहे असे म्हणत असतो. गती लक्षात यावयास दोन पदार्थांची आवश्यकता असते. समस्त विश्व ब्रह्मांड एक वस्तू मानल्यास त्यात गती कशी असणार? समष्टी ही निरपेक्ष सत्ता होय. परंतु तिच्या अंतर्गत असलेला प्रत्येक परमाणू सारखा परिणाम पावत असतो निरंतर गतिमान असतो म्हणजे समष्टी अपरिणामी त्याचबरोबर परिणामीही आहे. सगुण आणि निर्गुण दोन्हीही आहे. जगत् गति आणि ईश्वर यासंबंधी आमची धारणा अशी आहे. 'तत्वमसि'चा हाच अर्थ आहे. निर्गुण हे आपल्यापासून सगुणाला हिरावून घेत नाही. निरपेक्ष हे सापेक्षाचा नाश करीत नाही. उलट आपल्या बुध्दीचे व हृदयाचे पूर्ण समाधान होईल अशा तऱ्हेने त्याचे स्पष्टीकरण करते. सगुण ईश्वर काय किंवा जगातील कोणतीही वस्तू काय, सारीच आपल्या मनाच्या माध्यमातून दिसणारी त्या निर्गुणाचीच रूपे होत. आपण ज्यावेळी आपल्या मनाच्या पलीकडे जाऊ आपले क्षुद्र सीमाबध्द व्यक्तीत्व सोडू शकू त्यावेळी आपण त्याच्याशी एक होऊन जाऊ. 'तत्वमसि'चा हा अर्थ आहे. आपले यथार्थ निरपेक्ष स्वरूप आपण जाणावयास हवे.

### प्रेम स्वयंभगवान

सत्याची खूप पावित्र्य, एकत्व, जे जे एकत्वाप्रत नेते, मीलन घडवून आणते ते सत्य, प्रेम हे सत्य होय आणि द्वेष असत्य होय. कारण प्रेम मीलन साधते, द्वेष भेद निर्माण करतो. द्वेषामुळे माणसात वेगळेपणा निर्माण होतो. द्वेष करणे चूक. द्वेष विघटनात्म शक्ती, जी वेगळेपणा पृथक्पणा आणते आणि माणसाचा नाश करते. प्रेम संघटनात्मक असते ते पृथक्पणा नाहीसा करून मीलन घडवून आणते. प्रेम एकत्वाप्रत नेते. प्रेमाने अभेद जन्मतो. प्रेमाने आपण एक होतो. प्रेमच मूलभूत सत्ता आहे. प्रेम स्वयं भगवानच होय.

(समग्र विवेकानन्द या ग्रंथमालेवरून संपादित)

श्री. शं. बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*बीज, मॉडेल व साधना या लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे''

- लोकमान्य बाळ गंगाधर



लो. टिळकांच्या या घोषणेतील दोन शब्द महत्त्वाचे आहेत **१) स्वराज्य २) जन्मसिद्ध**

हे आध्यात्मिक (Spiritual Science) पारिभाषिक शब्द होते. तैत्तिरीयोपनिषद मधील 'षष्ठोऽनुवाक' मधील **''सुवरित्यादिवे। मह इति ब्रह्माणि।**

आप्नोति स्वराज्यम्।....'' या २ ऱ्या श्लोकात किंवा ऋचेत 'स्वराज्य' हा शब्द येतो. त्याचा अर्थ कोणता?

**स्वराज्यांचा आध्यात्मिक अर्थ :**

मंत्र पुष्पांजलीतील 'स्वराज्य, साम्राज्य' चा अर्थ कोणता? श्री १०८ सोंवारी महाराज ह्यांच्या दैशिक शास्त्रात 'स्वराज्य'चा अर्थ कोणता? त्याचा पूर्ण अर्थ समजण्याकरिता हे उपनिषद वाचून त्याचा 'अर्थ बोध' झाल्यास 'स्वराज्याचा' खरा आध्यात्मिक अर्थ प्राप्त होईल. पण, आपल्या लेखापुरता त्याचा संक्षिप्त अर्थ समजण्यासाठी 'उपनिषद रहस्य' ह्या महात्मा नारायण स्वामी ह्यांच्या पुस्तकातील भाष्याचा उतारा वाचल्यास हा अर्थबोध होऊ शकेल.

''शरीर से जीव निकलकर अग्नि, वायु, आदित्य मे होता हुआ ब्रह्मलोक मे पहुंचकर मुक्ती के आनंद का उपभोग करने लगता है। (छांदोग्य - देवयानमार्ग)

उसी मुक्तावस्था को जहाँ प्राप्तव्य स्वतंत्रता की पराकाष्ठा हो जाती है, यहाँ ''स्वराज्य'' कहा गया है। ह्याचा सोपा सरळ अर्थ म्हणजे 'स्वराज्य' म्हणजे पूर्ण आत्मस्वातंत्र्य.

**आत्मस्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य :**

मग, समाजाने 'स्वराज्य' याचा राजकारण शास्त्रातला अर्थ 'स्वातंत्र्य' म्हणजे परकीय सत्तेपासून मुक्त असा व्यावहारिक सोयिस्कर अर्थ जाणला. इथेच भारतीय स्वातंत्र्य संकल्पनेची एक मोठी चूक झाली. हे असे कां व्हावे?

कारण त्यामुळे भारतीय चळवळीला केवळ भौतिक स्वरुप प्राप्त झाले. अध्यात्म व राजकारण हे दोन वेगळे मार्ग आहेत कां। हयाचे उत्तर भारतीय सांस्कृतिक सत्य जीवन निष्ठा यांत सापडेल!


**Human Being and Becoming:**

१) ह्याचे उत्तर हवे असल्यास 'माणूस' ही संज्ञा काय दर्शविते हे समजून घ्यावयाला हवे.

२) तसेच अध्यात्म (आत्मा ह्या संज्ञेचा अभ्यास) व 'स्वातंत्र्य' (भौतिक, राजकीय, सामाजिक) ही संकल्पना जाणावयाला हवी.

३) धर्म (Religion - organised) आणि सनातन धर्म (Cosmic Creation Law of life and the universe) म्हणजे चैतन्य व वैश्विक निर्मितिचे व जीवनाचे नियम व कायदे हे जाणून घ्यावयाला हवेत ह्यातील फरक स्पष्टपणे जाणावयाला हवा.

आपण ज्याला (Human Being) (पुरुष) असे म्हणतो ती खरोखर आत्मा + मर्त्य, नश्वर देह यांचा संयुक्त रूप (Form) आहे.




Picture No 3

पण, हे झाले शाब्दिक ज्ञान. प्रत्यक्ष 'स्वत:चा आत्मा' हा स्वत:ला आपल्या देहाच्या इंद्रियामार्फत बघु शकतो कां ? बघावे कां? हा तर 'अनुभूती शास्त्राशी' संबधित अर्थ आहे.

**महामहोपाध्याय बाळ शास्त्री हरदास :**




त्याचे उत्तर उपनिषदे देतात. महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास यांच्या 'वैदिक राष्ट्रदर्शन' 'वैदो कां आध्यात्मिक अंतरंग ह्यांतील 'आत्मानुभुति के साधन ह्या परिच्छेदांत ते सांगतात- कीं तैतरीय उपनिषद (३-१०. ५-६) ह्यांत उल्लेख आहे. ''इंद्रियों को उत्पन्न करते समय ही परमेश्वर ने उन्हे पराङ्मुख रखा उस कारण मनुष्य दृष्टि अंतर्मुख न होकर बहिर्मुख हो होती है। अपनी दृष्टी अंतर्मुख करके प्रत्यक्ष आत्मा को देखता है कोअी विरला ज्ञानी, धैर्यशाली साधक।''

ह्या क्रियेचे पूर्ण योगाभ्यास वर्णन इथे केलेले सापडेल!

**भारताचे एकांगी भौतिकवादी राजकीय नेतृत्व:**

ह्या सर्व उपलब्ध ज्ञानाकडे दुर्लक्ष करून भारतीय सामाजिक नेतृत्वाने पाश्चात्यांच्या 'भौतिकवादी प्रगतीचा' जीवन मार्ग चोखाळला. ह्यातील मोठी चूक कोणती?

आपण शास्त्रीय ज्ञानात मानवी रूप हे आत्मा व देह

यांच्या जोडणीतील 'देहबद्ध आत्मा' किंवा महायोगी अरविंद यांच्या शब्दातील Embodied Conciousness' असा 'संयुक्त स्वरुप ध्वनित होणारा सत्य अर्थ हाकून केवळ 'मानवी देह' हा एकांगी अर्थ व्यवहारात मानला. अर्थातच, हा देह 'मर्त्य व नश्वर असल्याने पृथ्वीवरील दृश्य जीवनांतील भौतिक जीवनाचाच विचार व आचरण आदर्श मानले. स्वातंत्र्य चळवळीचे संपूर्ण स्वरुप 'एक भौतिक चळवळ' असे मानून भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, अपौरुषेय ज्ञान ह्यांचे अवमूल्यन झाले. जीवात्म्याचा जन्म, मृत्यू व पुनर्जन्म ह्या वैश्विक चक्रातील आध्यात्मिक ज्ञानातील गतीमय सत्याला (Dynamic Reality) तिलांजली दिली.

**बीजात्मक भारतीय संस्कृतीचे अवमूल्यन:**

ह्या सामाजिक, राजकीय दृष्टिकोनातील घोडचूक घडण्याचा इतिहास नीटपणे सांगितला गेला नाही. ह्याचे गंभीर परिणाम आज दिसत आहेत.

अतिशय संक्षिप्तपणे जर वर्णन करावयाचे असेल तर असे म्हणावे लागेल की १) ज्ञान + कर्म, २) देह + आत्मा ३) जन्म - पृथ्वीवरील संस्कार व प्रगती + मृत्यू (देहाचा) ४) व, 'आत्म्याचा दिव्यत्वाकडे प्रवास' ह्या वैदिक चैतन्यजीवाचा सत्य मार्गावरचा विश्वास उडून जाऊन, भारतीय समाजाने युरोपियन भौतिकवादी व जड विज्ञानवादी व भोगवादी संस्कृतीचा मार्ग कळत न कळत स्वीकारला राजकीय आदर्श हा पूर्णपणे भौतिकवादी झाला व त्यामुळे (Integral life) चा अव्हेर झाला ह्याशिवाय खऱ्या अध्यात्ममार्गाचा विसर पडून किंवा विश्वास ढिला होऊन Religion म्हणजे धर्म ह्या मानव निर्मित अज्ञानी संकल्पनेवर प्रत्यक्ष जीवन व्यवहार चालू ठेवला. ह्याची कारणे अनेक आहेत. पण ख्रिश्चन, इस्लाम वगैरे प्रेषितांच्या मानवी संकल्पित धर्मांच्या प्रभावाखाली समाज ओढला गेला. सुसंस्कृत मानवी दैवी आदर्श विसरुन तो प्राणीजीवन व भोगवादी बनला. हिंदूधर्मसुद्धा घसरला.

**सनातन धर्मांचा अर्थबोध हवा :**

ह्या उलट 'सनातन धर्म' म्हणजे Law of creation of life & the universe ह्या अपौरुषेय ज्ञानावर आधारलेल्या वेदिक सांस्कृतिक जीवनधर्माचा हळू हळू त्याग सुरु केला. ह्या धर्माचा अभ्यासही बंद पडला किंवा अशुद्ध, विकृत झाला. त्यांतील साधना, योग संस्कार क्रिया ह्या दैनंदिन जीवनातून तडीपार झाल्या.

ह्याला एक मुख्य कारण म्हणजे 'निवृत्तीपर वेदांत तत्त्वज्ञानाने पृथ्वीवरील जीवनाला 'मिथ्या' वा जीवन ही संज्ञा बहाल केल्याने Integral life म्हणजे एकात्म संयुक्त जीवनक्रम ह्या खऱ्या वेदिक ज्ञानाला समाज पारखा झाला. त्याने पृथ्वीवरील जीवन 'मिथ्या' वा अर्थहीन मानले व Integral life ला तिलांजली दिली.

वेद व उपनिषदे ह्याबद्दल निःसंदिग्धपणे असा उपदेश करत आहेत की आध्यात्मिक व भौतिक जीवन ही दोन्हीही एकात्म पद्धतीनेच जगावयाची आहेत. दोन्ही स्तरावरील साधना, कर्म पुरुषार्थ हा एकमेकाला पूरक आहे!!

उदाहरणार्थ, इशोपनिषद् मधील खालील श्लोक बघुया.

विद्यांश्चाविद्यां च यस्तद् वेदोभय सह।
अविद्यया मृत्यूं तीर्त्वा विद्ययामृतश्नुते ।।११।।

अर्थ - ''जो ज्ञान और कर्म इन दोनों को साथ साथ जानता है वह कर्म से मृत्यू को तैरकर ज्ञान से अमरता को प्राप्त होता है।''

हा अर्थ लावताना अव्दैत वेदांतवाद्यांनी एक गंभीर चूक केली ती कोणती? 'विद्या' ला आपण ज्ञान समजतो हे निर्विवाद आहे. अर्थात, हे 'सत्य ज्ञान' असावे हा सुद्धा त्यांचा विशेष जाणला पाहिजे.

पण 'अविद्या' याचे 'मिथ्याज्ञान' हे वर्णन पारिभाषिक आहे.

'अविद्या'चा योगिक अर्थ 'कर्म' हा आहे.

**जीवात्मा ज्ञान व कर्म :**

महात्मा नारायण स्वामी हे योगिक अर्थ व निष्कर्ष कशावर आधारून आहे. हे सांगतात. ह्या उपनिषदिक मंत्राची 'देवता' म्हणजे त्याचा 'विषय' हा 'आत्मा' हा आहे.

आत्म्याचे स्वाभाविक गुण दोन आहेत. एक ज्ञान व दुसरे 'कर्म' मग 'विद्या' ह्याचा संबंध 'ज्ञान' संकल्पनेशी त्यामुळेच शरीराच्या ज्ञानेंद्रियांशी आहे. तर, 'अविद्या' ह्याचा 'कर्म' (क्रिया) असा अर्थ झाल्याने तो शरीराच्या कर्मेन्द्रियांशी जोडलेला आहे.

ते पुढे म्हणतात, " अब इन मंत्रोका अर्थ भी साफ हो गया, कि केवल 'ज्ञान' का या केवल 'कर्म' का सेवन करना अंधकार मे पडना है।"

ज्ञान उपलब्ध करके उसको कार्य मे परिणत करना ही मनुष्य - जीवन का सब से बडा उद्देश है" । हा पुरावा अपौरुषेय वेद ज्ञानावर आधारलेला आहे, त्यामुळे भारतीय तत्वज्ञानात जो गोंधळ आजही चालू आहे त्यावर 'प्रकाश' पडेल.

अद्वैत शंकर भाष्य, रामानुजाचार्य माधवाचार्य, वल्लभाचार्य, सायनाचार्य व इतर अनेक पंडितांनी जो वैचारिक मतामतांचा 'गोंधळ' मांडून ठेवला आहे, त्यामधून वास्तविक मर्त्यशरीर असलेला अनंत तत्वाचा 'प्रवासी जीवात्मा' हा पृथ्वीवर जन्म घेऊन कुठला "पुरुषार्थ" करणे त्याला 'योग्य व आवश्यक' आहे यावर 'कर्म' करणे कसे 'आत्म्याचाच धर्म' आहे हे स्पष्ट होते.

म्हणजे 'जीवात्मा' हा ज्ञाता व साधक आहे. त्याचे पृथ्वीवरील स्थूल शरीर हे त्याचे 'मर्यादित' आत्मसाधन आहे. आनंद, भोग, सुख दुःख ह्या त्याच्या जाणीवांचा अर्थ आत्म्याच्या विशेष अभ्यासाचा आहे, की जो अनुभव व नवीन ज्ञान घेऊन त्याचा वैश्विक प्रवास पुढे चालू रहाणार आहे.

**जीवात्म्याचा वैश्विक मार्ग :**

जीवात्म्याचा हा प्रवास त्याच्या 'सुक्ष्म शरीरासोबत होतो' त्याबद्दल सविस्तर भाष्य व तीन शरीरांचे चित्रमय वर्णन महात्मा नारायण स्वामी यांच्या 'उपनिषद रहस्य' ह्या पुस्तकातून घेतले आहे ते 'पृष्ठ ५८ व ५९' वर ईशोपनिषद भाष्यात आहे ते इथे मुळातूनच उद्धृत केले आहे व सुस्पष्ट आहे.

खालील उतारे वाचा -

कारण रूप प्रकृति जो अंश हमारे अन्दर है उसी का कल्पित नाम कारण शरीर है। कार्य शरीर दो हैं - सूक्ष्म और स्थूल। इन तीनों के काम पृथक् - पृथक् हैं

**१) स्थूल शरीर** - सूक्ष्म शरीर का साधन है। उसी के द्वारा विषयमय जगत् से सूक्ष्म शरीर का सम्बन्ध होता है, स्थूल शरीर के विकसित और पुष्ट होने से शारीरिकोन्नति होती है। राममूर्ति और सैण्डो आदि इसके उदाहरण हैं।

**२) सूक्ष्म शरीर** - १७ वस्तुओं के समुदाय का नाम है -

५ ज्ञानेन्द्रिय

५ सूक्ष्म विषय - तन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप, रस, गन्ध)

५ प्राण (प्राण, अपान, व्यान, समान, उदान)

१ मन

१ बुद्धि

योग १७

---

भूतकाळ आपल्याला आठवणींचा आनंद देतो; भविष्यकाळ स्वप्नांचा आनंद देतो पण आयुष्याचा आनंद केवळ वर्तमानकाळच देतो.

सूक्ष्म शरीर के विकसित और पुष्ट होने से मानसिकोन्नति होती है। मानसिकोन्नति किये हुए पुरुष जाति के नेता, राजा और उच्च राज्य कर्मचारी हुआ करते है और कारण - शरीर के विकसित और पुष्ट होने से मनुष्य में ईश - प्रेम आता है और वह भक्त और योगी बना करता है। आशय यह है कि तीनों प्रकार के शरीर उन्नत होने चाहिए। शरीरों का इतना विवरण जान लेने से इन मन्त्रों के अं समझ लेने में सुगमता हो जाती है। मन्त्र कहता है कि यदि स्थूल और सूक्ष्म शरीरों की उपेक्षा करके केवल कारण शरीर की उन्नति चाहते हो तो अन्धकार में पड़ना पड़ेगा, क्योंकि बिना स्थूल और सूक्ष्म शरीरों के उन्नत हुए कारण शरीर को उन्नति प्राप्त नहीं हो सकती। और यदि कारण शरीर की उपेक्षा करके कार्य शरीर स्थूल + सूक्ष्म शरीरों को उन्नत करना चाहते हो तो भी भविष्य अन्धकारमय होगा, क्योंकि इस से नास्तिकता उत्पन्न होगी। जैसे चार्वाक और यूरोप के प्रकृतिवादी नास्तिक विद्वान्। इसीलिए तीसरे मन्त्र में, सिद्धान्त और कर्तव्य रूप से, यह शिक्षा दी गई है कि दोनों प्रकार के शरीरों की उन्नति साथ - साथ होनी चाहिए, तभी मृत्यु का बन्धन छूट सकता है। मृत्यू का बन्धन किस प्रकार छूट सकता है यही अन्तिम प्रश्न है, जो इन मन्त्रों के सम्बन्ध में उत्पन्न होता है। इस प्रश्न का उत्तर सुगमता से समझ में आ जावे इसलिए हम इन शरीरों का एक 'कल्पित चित्र' नीचे देते हैं -

तीनो शरीरों का चित्र

स्थूल शरीर - अन्नमय कोष

सूक्ष्म शरीर

१. प्राणमय

२. मनोमय

३. विज्ञानमय कोष

कारण शरीर = आनन्दमय कोष

स्वप्नावस्था के द्वारा सूक्ष्म कारण शरीरों का सम्बन्ध

जाग्रत अवस्था के द्वारा सूक्ष्म = स्थूल शरीरों का सम्बन्ध

प्रमाण के द्वारा स्थूल सूक्ष्म शरीरों का सम्बन्ध

इन्हीं तीनों शरीरों का विभाग एक और प्रकार से किया गया है जिसे कोष कहते हैं उसका विवरण इस प्रकार है -

१) स्थूल शरीर - अन्नमय कोश

२) सूक्ष्म शरीर - १. प्राणमय, २. मनोमय, ३. विज्ञानमय कोश।

३) कारण शरीर - आनन्दमय कोश

योग - ३ शरीर - ५ कोश

इन तीनों शरीरो के दो सम्बन्ध है।

१) अवस्थाओं के द्वारा सम्बन्ध।

२) प्राण के द्वारा सम्बन्ध।

हा जन्म जन्मांतरीचा दैविक प्रवास हाच जीवात्म्याचा दिव्य प्रवास आहे. महायोगी अरविंद त्याला 'दिव्य जीवनाचे अंतिम साध्य' म्हणतात. 'Divine Consciousness' - 'Life Divine'



महायोगी अरविंद

पातंजल योगशास्त्र याचे शास्त्रीय नियम सांगते. जीवात्मा व सूक्ष्म शरीर मुख्यत: चित्ताने परिवेष्टित रहातात

स्वप्नांची जागा वैफल्याने घेतली की माणूस वृद्ध झाला आहे, असे समजावे. - जॉन बॅरिमोर

आणि पृथ्वीवरील जीवात्म्याकडून होणाऱ्या 'कर्मयोगामुळे' हे संचित 'कर्माशय', चित्तामध्ये राखले जाते व जीवात्म्यावरोबर वैश्विक जन्मजन्मांतरीचा प्रवास करते.

ज्या संस्कार क्रिया 'वैदिक योगशास्त्रानुसार व अग्निदेवतेच्या मदतीने, आवाहनानंतर, मंत्रशास्त्रानुसार देहबद्ध जीवात्म्यावर केल्या जातात, त्याही ह्या 'चित्ताच्या' कर्माशयाचा महत्वाचा भाग बनतात.


आपल्या विचारांचा रोख मुख्यत: ह्या मुद्यांवर आहे की ह्या विश्वाची निर्मीती व त्यातील 'मानवी देहाची' निर्मीती ही काही निरर्थक प्राणीजीवन व भौतिक भोगवादी जीवन जगण्यासाठी केलेली नाही. ह्या जीवात्म्याच्या उद्धारासाठी केवळ ह्या तीन शरीरे व वैश्विक जन्म-मृत्यूच्या व पुनर्जन्माच्या फेऱ्या ज्या विलक्षण वैश्विक यंत्रवत रचनेतून राबवल्या जातात, त्याची भरपूर आर्णात व कृतज्ञता ही अनेक संत, योगी, तत्वचिंतक व आचार्यांच्या लिखाणातून व्यक्त झालेली आहे. ही 'जगन्नाथाच्या' रथासारखी किंवा बृहद अरण्यक उपनिषदातील 'वैश्विक अश्वासारखी घोडदौड करत आहे - अनंताच्या पडद्यावर!!

समर्थ रामदास म्हणतात-

मोले अनर्घ्य रत्ने येती। परी चिंतामणी न ये हाती।  
तेवि बहुत योनियें जन्म होती। परी मनुष्य देह प्राप्ति दुर्लभ ॥  
म्हणून नरदेह श्रेष्ठ। नाना देहा मध्ये वरिष्ठ।  
जयाचेनि चुके अरिष्ठ। जन्म मरणाचे ॥  
म्हणून नरदेह निधान। जेणे ब्रह्मसायुज्य घडे गमन।  
देववांछिती मनुष्यपण। देवाचें स्तवन नरदेह ॥

संत एकनाथ महाराज म्हणतात -

भरतखंडी नरदेह प्राप्ती। हे तो परम भाग्याची संपत्ती।  
तेथे हि विवेक परमार्थी। त्याच्या वशवर्ती मी परमात्मा।  
नरदेह परमपावन। जो भक्तिज्ञानाचे आयतन।  
जेथे साधे ब्रह्मज्ञान। तो धन्य धन्य नरदेह।



समर्थ रामदास

**भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक ध्येयवाद :**

तेव्हां आतापर्यंतच्या विवेचनावरुन हे दिसले की भारतीय संस्कृती ज्या बीज संकल्पनेवर फुलली आहे, ज्या यंत्रणेवर वा वैश्विक मांडेलवर कार्यरत आहे, ज्या नरदेहामार्फत व व्यष्टि - समष्टि - प्रकृति ह्यांच्या मदतीवर साधन व कर्मप्रवण आहे त्यामुळे गीतेत सांगितलेल्या आत्म्या ने आत्म्याचाच स्वत: उद्धार करावा. हा गीतायोग, बुद्धयोग, ज्या पातंजल, नाथ संप्रदाय, कुंडलिनी जागृती, क्रिया वगैरे योग साधनेने साधला जातो, तो ह्या विश्वातील अत्यंत आश्चर्यकारक असा कॉशसनेसच्या दिव्यत्वाचा प्रयोग आहे. तो सांस्कृतीक सुद्धा आहे. कारण त्याचा पाया सतचित आनंद हा आहे.

**अनुभूती शास्त्र :**

पण, अजुनही ह्या ज्ञानाला आणखी एका संकल्पनेच्या जाणीवेची व शास्त्राची जोड आवश्यक आहे.

महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास ह्या वैशिष्ट्याकडे लक्ष वेधतात. ''भारतीय तत्वज्ञान हा प्रत्यक्ष साक्षात्काराचा अथवा जीवन घडवण्याचा विषय आहे. याची सर्वांत मोठी खूण ही आहे की 'अनुबंधचतुष्ट्यावाचून (चित्त, बुद्धी, मन, अहंकार) येथे तत्वज्ञानाच्या क्षेत्रांत केवळ बुद्धि आहे म्हणून कोणालाहि प्रवेश नाही.

अनुबंध चतुष्ट्य म्हणजे त्या त्या शास्त्रातील अधिकारी व साधने यांच्या निर्देश होय.

पुरुषार्थ विचार व तत्वज्ञान यांचा संबंध असल्यामुळे भारतातील तत्वज्ञानाचे पर्यवसान नेहमी अनुभूतींत झालेले आहे. अत्याधुनिक काळापासून तर उपनिषद काळापर्यंत या अनुभूतिवादाचा अविष्कार झालेला सुसूत्रपणे आढळून येतो. भारतीयांनी नुसते तत्वाचे चिंतन केले नाही तर कांही तरी प्रत्यक्ष पाहिले, स्वत: अनुभविले इतकेच नव्हे तर ते स्वत: काही तरी होऊन राहिले.

ह्या अनुभूतीवादावर अधिकार व प्राप्ति मिळवणारी कांही थोर सत्पुरुषांची नांवे पुढे येतात. रमण महर्षी, महायोगी अरविंद घोष, स्वामी विवेकानंद, स्वामी रामकृष्ण परमहंस, संत ज्ञानेश्वर महाराज वगैरे मग ह्या 'अनुभूतीवादाबद्दल' आपल्याला आधिक परिचय करून घ्यायचा आहे.

तो आपण 'दिशाच्या पुढल्या अंकात करूंया!

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●



स्वामी विवेकानंद

**दिशासाठी**

आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.

तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.

– संपादक

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर, माध्यमिक विभाग

### गुरुपौर्णिमा :

मंगळवार दिनांक ३ जुलै रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

इ. ६ वी च्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माजी शिक्षिका सौ. रुक्मीणी कुलकर्णी या होत्या. इ. ७ वी च्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माजी शिक्षिका श्रीम. आशा जोशी या होत्या.

इ. १० वी - आदर्श कनिष्ठ महाविद्यालयातील भूगोल विषयाचे प्राध्यापक, बदलापूर भूषण, एज्युकेशन सोसायटी अंबरनाथ, आचार्योत्तम पुरस्कार प्राप्त, ठाणे जिल्हा विद्यासेवक पतपेढीचे खजिनदार सन्माननीय श्री. रमेश बुटेरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी वि. प्र. मं. चे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले हे ही उपस्थित होते.

### वृक्षदिंडी :

ठाणे जिल्हा भारत स्काऊट-गाईड व महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग तसेच रोटरी क्लब ऑफ ठाणे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ जुलै रोजी येऊरच्या पायथ्याशी वृक्षदिंडीचे आयोजन केले होते. तेथे वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी स्काऊट मास्टर श्री. प्रकाश पांचाळ, गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर व स्काऊट-गाईडचे विद्यार्थी उपस्थित होते.

### हस्ताक्षर स्पर्धा :

लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त २६ जुलै रोजी ५ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

### राखी प्रदर्शन व विक्री :

'पंतप्रधान ढाल स्पर्धा' 'सत्कृत्य' या उपक्रमांतर्गत इ. ७ वी 'क' च्या गाईड्सनी स्वतः बनवलेल्या राख्यांचे प्रदर्शन व विक्री २७ जुलै रोजी हस्तकला दालनात भरवले होते. यातून मिळणाऱ्या नफ्यातून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांची फी भरण्यात आली.

### प्रशिक्षण :

'सर्व शिक्षण मोहीम'' अभियानांतर्गत दि. २८ जुलै रोजी सर्वांकष मूल्यमापन प्रशिक्षणास शाळेतील सर्व शिक्षक ठाणे महानगर पालिका शाळा क्र.२ ठाणे येथे उपस्थित राहिले.

## तंत्रनिकेतन

### वार्षिक अहवाल २०११-२०१२

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन आणि माहिती तंत्रज्ञान केंद्राचा सन २०११-२०१२ चा वार्षिक अहवाल विद्या प्रसारक मंडळाचे स्थापना दिनाचे औचित्य साधून दि. १ ऑगस्ट २०१२ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सादर केला. तो खालीलप्रमाणे -

**१) २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात खालील अभ्यासक्रमांसाठी मंजूर उपलब्ध जागा व प्रत्यक्ष प्रवेश घेतलेले विद्यार्थी**

| अभ्यासक्रम | मंजूर उपलब्ध जागा | प्रत्यक्ष प्रवेश घेतलेले विद्यार्थी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण विद्यार्थी |
| Post S.S.C. Diploma Programmes(seven) | 390 | 407 | 323 | 271 | 1001 |
| Advanced Diploma Programmes(Three) | 180 | 88 | 10 | N.A. | 98 |
| Certificate Courses(Three) | 194 | 103 | N.A. | N.A. | 103 |

२) सन २०१२ च्या उन्हाळी निकालाचे विश्लेषण

| वर्ष | प्रत्यक्ष परीक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण | ATKT | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | ३९५ | १६७ | ३३१ | ३३१ | ८३.८०% |
| द्वितीय | ३१८ | १८२ | ६३ | २४५ | ७७.०४% |
| तृतीय | २७१ | २५१ | - | २५१ | ९२.६१% |

३) सन २०१२ MSBTE च्या उन्हाळी वार्षिक परीक्षेत तंत्रनिकेतनमधून अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी

| अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| केमिकल इंजिनियरिंग(CH) | वाकडे नितिन अंकुश | ८९.३५% |
| इलेक्ट्रीकल पावर सिस्टिम (EPS) | अडसोड सुनिल विश्वास | ८४.२४% |
| इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक्स (IE) | शुक्ला शिवप्रकाश सुरेश प्रसाद | ९०.०५% |
| इन्स्ट्रुमेंटेशन (IS) | तमाजी अदनान | ८०.५२% |
| इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी (IF) | पठाण श्रमीन | ८९.६९% |
| कम्प्युटर इंजिनियरिंग (CO) | पाटील कोमल रविंद्र | ८९.१६% |
| मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स (MU) | चव्हाण अनुश्री विनोद | ८५.०६% |
| कम्प्युटर सॉफ्टवेअर सिस्टिम ॲनालिसिस ॲन्ड ॲपलिकेशन्स (CP) | जमादार हेनाय अरिफ | ८९.०७% |
| इंडस्ट्रियल सेफ्टी (IT) | धामणकर अतुल आप्पा | ७२.५४% |
| एनर्जी मॅनेजमेन्ट ॲन्ड ऑडिट(EP) | किरदत संजोय | ८३.५६% |

४) अभ्यासेतर उपक्रमांतील सहभाग

- निबंध सादरीकरण, प्रकल्प आणि प्रश्न मंजुषा अशा विविध स्पर्धांमध्ये जवळ जवळ ६० विद्यार्थ्यांच्या गटाचा सहभाग
- २५ पारितोषके विद्यार्थ्यांकडून प्राप्त.
- विविध विभागांतर्फे ३४ अभ्यासक तज्ज्ञांची व्याख्याने
- विविध विभागांतर्फे ३८ ठिकाणी औद्योगिक भेटी.

५) ISTE नरसी मोनजी सर्वोत्कृष्ट प्रकल्प पारितोषिक – महाराष्ट्र राज्य

**प्रकल्प गट** – श्री. अमित दळवी, श्री. अमर एस. दिघे, श्री. शैलेश डी. केसरकर, श्री.मयुरेश बी. महाशब्दे

**प्रकल्प शीर्षक** – Wireless Power Transmission

**प्रकल्प मार्गदर्शक** – सौ. एन. व्ही. वडेर

**पारितोषिक** – रोख रक्कम आणि पदक

६) उच्च शिक्षण प्राप्तीकरिता खालील शिक्षकांचा (स्टाफचा) सहभाग

| अ.क्र. | शिक्षक | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | सौ. जी. एस. इंगवले | केमिस्ट्री | PhD |
| २ | सौ. आर. डी. तेंडुलकर | इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ME |
| ३ | सौ. जी. ए. पुजारे | मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स | ME |
| ४ | सौ. सांभी एन. लगुडुवा | इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स | ME |

जगभरातील विविध जाती, धर्मांची शिकवण, आचारसरणी ही भिन्न आहे. मात्र जगात 'सत्य' हेच अमर असल्याच्या शिकवणीबाबत मात्र त्यांची एकजूट आहे. – महात्मा गांधी

**७) 'Future power systems for Green & Clean world' या १२व्या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे दि. २० ऑगस्ट रोजी आयोजन**

- श्री. व्ही. एल. सोनावणे (सन्मानीय सदस्य, महाराष्ट्र एनर्जी रेग्युलेटरी कमिशन)(MERC) हे प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून हजर होते.
- श्री. जी. बी. धानोकर (जॉईन्ट डायरेक्टर, रिजनल ऑफिस टेक्निकल एज्युकेशन) यांचे हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले होते.

**८)'Progress & prosper through entrepreneurs & Intrapreneurs' या १३ व्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे दि. १५ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले होते.**

- प्रमुख पाहुणे म्हणून श्री. जगदीश आचार्य,(CEO, Asian PPG, Mumbai) हे होते.
- प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ए. बी. पंडित, (चेअरमन HYCA टेक्नॉलॉजीज प्रा. लि. मुंबई) हे होते.

**९)"Industrial IT Trends" एक दिवसीय चर्चा सत्र हे माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे ७ जाने. रोजी आयोजित केले होते.**

**१०) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने(MSBTE) तंत्रनिकेतन २०१२ मधील इलेक्ट्रॉनिक्स गटाच्या विद्यार्थ्यांकरिता राज्य-स्तरीय निबंध सादरीकरण स्पर्धा दि. ४ फेब्रुवारी या दिवशी आयोजित केली होती.**

मेडिकल इलेक्ट्रानिक्स, इन्स्ट्रुमेंटेशन आणि इंडस्ट्रीयल इलेक्ट्रानिक्स या विभागांतर्फे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले होते.

**११) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अंतर्गत शैक्षणिक तपासणी**

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे सन २०११-१२ चे म.रा.तं. मंडळ या अंतर्गत शैक्षणिक तपासणी संदर्भातील उत्कृष्ट कामगिरी बद्दल चे पत्र प्राप्त.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | कामगिरी (performance) |
|---|---|---|
| १ | केमिकल इंजिनिअरिंग | उत्कृष्ट |
| २ | कम्प्युटर इंजिनिअरिंग | उत्कृष्ट |
| ३ | माहिती तंत्रज्ञान | उत्कृष्ट |
| ४ | इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक्स | उत्कृष्ट |
| ५ | मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स | उत्कृष्ट |
| ६ | इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम | उत्कृष्ट |
| ७ | इन्स्ट्रुमेंटेशन | उत्कृष्ट |

**१२) विद्या प्रसारक मंडळाचे महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग वेळणेश्वरच्या उभारणीत तंत्रनिकेतनातील स्टाफच्या टीमचा सहभाग**

- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या योजनांची तयारी.
- प्रयोगशाळांचा विकास
- विद्यापीठ, तंत्रशिक्षण संचालनालय, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद इत्यादींच्या तज्ज्ञ सदस्यांच्या भेटी व व्यवस्थापन
- कर्मचाऱ्यांची निवड

**१३) सन २०११-२०१२ मधील सत्कर्म प्रतिष्ठान शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ष/अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | गुरव केतन कृष्णा | TYCH |
| २ | राऊत सोनाली अरुण | TYCH |
| ३ | पवार श्रुतिका रवींद्र | TYEP |
| ४ | भोईर चेतन गोपाळ | TYEP |
| ५ | सुरेकर अजय यशवंत | TYIF |
| ६ | देसाई पंकज प्रताप | TYIS |
| ७ | सास्ते प्रियांका संजय | SYMU |
| ८ | रेपाळे स्नेहा धनंजय | TYMU |

१४) आशिदा शिष्यवृत्ती पारितोषक प्राप्त विद्यार्थी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ष/अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | आग्रे अजित टी. | TYEP |
| २ | रासकर वैशाली | TYIF |
| ३ | जगे गितांजली | SYCH |
| ४ | पंड्या गणेश | TYEP |
| ५ | ठाकूर हर्षदा ए. | SYCO |
| ६ | भोर रेश्मा | SYCO |

१५) ३ डिसेंबर रोजी नवीन 'माहिती तंत्रज्ञान केंद्र' या प्रयोगशाळेचे डॉ. बेडेकर विद्यामंदिर (माध्यमिक विभाग) मध्ये उद्घाटन करण्यात आले.

**प्राचार्य दि. कृ. नायक**
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे
**भाषांतर : श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन,
ग्रंथालय, ठाणे

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**विद्या प्रसारक मंडळाचा ७७ वा वर्धापन दिन साजरा**

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचा ७७ वा वर्धापन दिन दि. ०१ ऑगस्ट रोजी संस्थेच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये संपन्न झाला.

१९३५ साली ५ विद्यार्थ्यांसह सुरु केलेल्या खाजगी मराठी शाळेपासून १७००० विद्यार्थ्यांना शिशु वर्गापासून पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणारी संस्था असा भव्य विस्तार आणि विकास विद्या प्रसारक मंडळाने केला आहे. विविध विषयांमध्ये शिक्षण आणि संशोधनाची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या मंडळाच्या १३ शैक्षणिक संस्था ठाण्यामध्ये कार्यरत आहेत. २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षापासून रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर या निसर्गरम्य पर्यटन स्थळी मंडळाने महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले आहे.

विविध विद्या शाखांमध्ये कार्यरत असलेल्या मंडळाच्या सर्व संस्थांच्या कार्याचा एकत्रित आढावा व गुणवंतांचा गौरव दरवर्षी १ ऑगस्ट ह्या वर्धापन दिनी केला जातो. या कार्यक्रमात सर्व विभागप्रमुख मागील शैक्षणिक वर्षात केलेल्या प्रगतीचा आलेख व लेखाजोखा आणि भविष्यातील योजनांची माहिती उपस्थितांना देतात.

या वर्षी झालेल्या कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले, कार्यवाह श्री. उत्तम जोशी, कार्यकारिणी सभासद श्री. श्री. वि. करंदीकर, इतर सभासद, सुप्रसिद्ध वास्तुविशारद श्री. वसंत पानसरे आणि सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात विद्याप्रसारक मंडळाचे

संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रतिमा शिल्पाला मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून झाली. त्यानंतर प्रतिवर्षीच्या प्रथेप्रमाणे सर्व मान्यवर व संस्थाप्रमुखांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला.

थोरले बाजीराव पेशवे सभागृहात प्राध्यापक कीर्ती आगाशे यांनी गायलेल्या सरस्वती वंदनेने मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रथम विद्या प्रसारक मंडळाच्या वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अहवाल कार्यवाह श्री. उत्तम जोशी यांनी सादर केला. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन या संस्थेचा अहवाल प्राचार्य श्री. दिलीप कुमार नायक यांनी सादर केला. डॉ. बेडेकर विद्यामंदिरचा अहवाल मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ गवई, सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेचा अहवाल सौ. कालिंदी कोल्हटकर, जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाचा अहवाल प्राचार्य डॉ. सौ. शकुंतला सिंग यांच्या वतीने उपप्राचार्या सौ. मोनिका देशपांडे, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा अहवाल प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, विधी महाविद्यालयाचा अहवाल प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार, डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचा अहवाल संचालक डॉ. सूर्यनारायणन व शेवटी प्रगत अध्ययन केंद्राचा अहवाल कार्यकारी संचालक डॉ. जी.व्ही. कुलकर्णी यांनी सादर केला. प्रत्येक संस्थेच्या अहवाल सादरीकरणानंतर त्या त्या संस्थांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि मंडळ संचलित शाळा, महाविद्यालये व संस्था प्रमुखांना पगडी प्रदान केली जाते व त्यांनी ही पगडी दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मंडळाच्या पदवी दान समारंभात परिधान करण्याची प्रथा आहे. या वर्षीपासून प्रतिवर्षी १ ऑगस्ट या वर्धापनदिनाचे औचित्य साधून विद्या प्रसारक मंडळाच्या विकासामध्ये गुणात्मक योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांना पगडी प्रदान करण्याचे मंडळाने ठरविले आहे व त्यानुसार मंडळाच्या शैक्षणिक विकासामध्ये व विस्तार योजनेमध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या खालील ५ व्यक्तींचा पगडी प्रदान करून डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

१. वास्तुविशारद श्री. वसंत पानसरे

२. विद्या प्रसारक मंडळाचे प्रबंधक श्री. रविंद्र रसाळ

३. वास्तुविशारद श्री. अविनाश भोळे

४. इमारत बांधकाम व्यवसायिक श्री. चंदुभाई ठक्कर

५. माहिती तंत्रज्ञान व्यवसायिक श्री. कौस्तुभ काळे

व्यासपीठावर उपस्थित असलेले विद्याप्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मा. श्री. मा. य. गोखले यांनी या निमित्ताने उपस्थितांशी संवाद साधताना १ ऑगस्ट या दिवसाचे इतिहासातील महत्त्व विशद केले व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कामगिरींचा आवर्जून उल्लेख केला.

अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. विजय बेडेकर यांनी आजच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन चिंता व्यक्त केली. त्याच बरोबर या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्यामध्ये तरुण पिढी व शिक्षकांच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडून येऊ शकतो असा आशावाद व्यक्त केला. मंडळाच्या एकंदर प्रगतीचा आढावा घेतानाच डॉ. विजय बेडेकर यांनी सर्व संस्थाप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सहकार्याबद्दल धन्यवाद दिले. कार्यक्रमाची सांगता जोशी बेडेकर कला महाविद्यालयाची विद्यार्थिनी क्षितिजा जोशी आणि तिच्या सहकाऱ्यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्री. नारायण बारसे यांनी केले.

– प्रा. श्री. नारायण बारसे

# रेनडियर

आमच्या सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षिका सौ. पूजा नाईक यांनी ''ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ'' आयोजित पाऊस या विषयावर स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला.

मी पावसाला म्हटलं ''तुझी महत्वाची नक्षत्रं निघून गेली''
पण तू आला नाहीस.
खो खो हसत तो म्हणाला,
मी रेनफिक्सिंग केलय पृथ्वीबरोबर
विमा पॉलिसी काढलीय एल.आय.सी. बरोबर
जीवन के साथ और जीवन के बाद भी
रहूँगा मैं अपनी मस्ती में.
का म्हणून मी ठरलेल्या दिवशी,
महिना लक्षात ठेवून दरवर्षी यायचे?
समुद्रावर आणि इतर जलाशयावर,
मस्टरवर साऱ्या करत राहायचं?
प्लॅस्टिकच्या पिशव्या आणि कचऱ्याच्या
ढिगाऱ्यावर बरसत राहायचं?
देवळात वाजणाऱ्या घंटांना, नवस बोलणाऱ्यांना
होम हवन करणाऱ्यांना बळी जायचं?
रेल्वेच्या पटरीमध्ये तुंबून तुंबून घुसमटत जगायचं?
२००५ या वर्षीचा शो परत परत करत राहायचं?
त्या पेक्षा मला मरण आलं तरी चालेल
पण असं नाही जगायचं.
जमीन स्वच्छ ठेवा, कारखाने कमी करा
आवश्यक तेवढ्याच वस्तू वापरा
हाव म्हणून कसलाच संचय करू नका
बाळांनो, मी माझं दुःख सांगतोय
मला वाहण्यासाठी जागा हवी आहे जागा ती द्याल का?
तुझ्यासाठी वन बी.एच.के., टु.बी.एच.के
माझ्यासाठी मात्र कळके, मळके, हलके डबके?
तुझ्यासाठी थ्री स्टार, फाईव्ह स्टार,
माझ्यासाठी मात्र गटार?
नंदनवनातून वाहणाऱ्या हिरव्यागार वनराईतून
वाहणाऱ्या पावसाला, तुम्ही नवसाचे आमिष दाखवून
बोलवता?
पण मी असा येणार नाही प्रदूषणाने बरबटलेल्या या
वसुंधरेची माफी मागा,
कष्टरूपी नांगराचा फाळ घेऊन घाम गाळू,
मानव व्हा सॉफ्टवेअर, हार्डवेअर इंजिनीअर बनाच,
पण त्या आधी टुंड्रामधला रेनडियर व्हा.
मग बघा नऊ नक्षत्रं आणि मी येतो की नाही ते
तो पर्यंत लबाड मानवाला एकच निरोप दे
जा, जा येत नाही म्हणून सांग
जा, जा येत नाही म्हणून सांग

**– सौ. पूजा नाईक**

•••

---

**व्यक्तिमत्त्व**

हा शब्द बरेचजण व्यक्तिमत्व असा लिहितात. व ला एक नाही तर दोन त लागतात.

**नावीन्य**

नावीन्य मधील वी दीर्घ आहे. अनेकांना तो ऱ्हस्व लिहिण्याची सवय असते.

---

शत्रूने केलेली स्तुती ही सर्वोत्तम कीर्ती होय!

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गाही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटीपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवींवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षांत सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,

**डॉ. विजय बेडेकर**

कार्याध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●



## स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे मशंदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते अप्रामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासी मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशाही ते करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता ज्याची महान, सीमा ज्याची अस्मान !
हे स्वप्न असे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनी सुस्वागत अपुले करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमी जिथे पाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार तोसला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न ज्या कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य ज्यांचे महान,
शिल्पही ज्यांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रसाद जणू सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानी बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरूपप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथे रंगती
विज्ञानसत्री सदा ज्यांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तपस्वी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा ज्यांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुदलही इथे निर्मिती
शक्तियुक्ति ज्यांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर ज्यांचे अणुरेणी वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि ज्याची, शक्ति ज्याची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर